
वर्ष पहिले । अंक अकरावा । सप्टेंबर २०२०

मनोविकास वर्ड्स







शिक्षण विशेषांक

पुस्तकामागची गोष्ट

मनोविकास वर्ड्स

अं । त । रं । ग

मनोविकास प्रकाशन

फ्लॅट ३-ए, चौथा मजला, शक्ती टॉवर, ६७२, नारायण पेठ, पुणे-४११०३०

दूरध्वनी : ०२०-२९८०६६६५ विक्री विभाग संपर्क : ८८८८५५०८३७

Email : info@manovikasprakashan.com

http://manovikasprakashan.com/

संपादकीय



शिक्षणाचा खेळखंडोबा रोखण्यासाठी...

तब्बल ३४ वर्षांनंतर देशाचं नवं शैक्षणिक धोरण केंद्र सरकारने जाहीर केलं आहे. त्याविषयी सध्या देशभर उलट-सुलट चर्चा सुरू आहे आणि ती आवश्यकही आहे. कारण या चर्चांमधूनच चांगलं काय आणि वाईट काय हे समोर येणार आहे. परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन शिक्षणाचा जो खेळ सुरू झाला आहे त्याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. कारण हा खेळ कायमस्वरुपी खेळता यावा असा प्रयत्न मोठमोठ्या कंपन्यांकडून सुरू आहे. ते जर का यशस्वी ठरले, तर धोरण कितीही चांगलं असलं तरी शिक्षणाचा खेळखंडोबा व्हायला वेळ लागणार नाही. आपल्या पाल्याच्या शैक्षणिक भवितव्याची काळजी करणाऱ्या पालकांना शाळा बंदच्या काळात समोर आलेला हा पर्याय कदाचित


चांगला वाटत असेल. परंतु तो शिक्षण देण्याचा खरा मार्ग नाही हे लक्षात घेण्याची गरज आहे. किंबहुना शिक्षक आणि शाळा यांना कोणताच पर्याय असू शकत नाही हे ध्यानात घेतलं पाहिजे.

शाळकरी मुलांच्या आयुष्यात शाळेचं स्थान अनन्यसाधारण असतं. तिथं मुलं केवळ अभ्यासक्रम शिकत नाहीत. त्या पलीकडच्या अनेक गोष्टी कळत-नकळत आत्मसात करत असतात. शाळा मुलांना मैत्री शिकवते, दुस्वास शिकवते. ती प्रेम शिकवते आणि रागही शिकवते. आपले गुरू कोण याची ओळख ती मुलांना करून देते. त्याचबरोबर गुरुंविषयीचा आदरभाव ती शिकवते. शिक्षकांचा गुरु म्हणून मुलांच्या आयुष्यात होणारा प्रवेश मुलांना अंतरबाह्य बदलून टाकणारा असतो. त्यातून शिक्षकांशी जुळणारं वेगळं नातं मुलांवर अनेक चांगले संस्कार करतं. अशा कितीतरी गोष्टी आहेत, ज्या ऑनलाईन शिक्षणातून साध्य होत नाहीत. किंबहुना ऑनलाईन शिक्षण मुलांना एकलकोंडा बनवू शकतं. बाह्य जगाशी त्याचा संबंध तोडू शकतं आणि त्यातून नवे मानसिक आजार देऊ शकतं. या उलट शाळा आणि शिक्षक हे मुलांना मानसिक आधारही देतात. त्याचं सामाजिक, समूह भान वाढवतात. तेव्हा मुलांना ऑनलाईनच्या जंजाळात न अडकवता त्यांची माणूस म्हणून जडणघडण व्हावी यासाठी शाळा लवकरात लवकर सुरू व्हाव्यात. त्यासाठी शिक्षक दिनानिमित्ताने शुभेच्छा!

नवी कोरी

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक
चळवळींचा दस्तऐवज ठरणाऱ्या


तीन ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा जीवन प्रवास
चळवळीच्या अंगानं अधोरेखित करणाऱ्या तीन प्रेरणादायी आत्मकथा.
त्यातली एक कहाणी विचारांवर निष्ठ असणं म्हणजे काय
याचं भान देणारी!
दुसरी आवेशाने दिलेल्या लढ्याची
आणि तितक्याच अलवारपणे सोडवलेल्या तिढ्याची!!
आणि तिसरी आहे
फकिरीचे वैभव
काय असतं याचं
दर्शन घडवणारी!!!



पायपीट समाजवादासाठी
एका निष्ठावंताचं आत्मकथन
पन्नालाल सुराणा
पृष्ठ : २९६ । मूल्य : ३५०



लढे आणि तिढे
चिकित्सक गप्पा... पुष्पाबाईंशी
मुलाखत : मेधा कुळकर्णी
पृष्ठ : २७२ । मूल्य : ३००



फकिरीचे वैभव
एका कार्यकर्त्याचे वेदनाकथन
विजय यशवंत विल्हेकर
पृष्ठ : २३२ । मूल्य : २५०

मनोविकास प्रकाशन
फ्लॅट नं. ३ए/४, शक्ती टॉवर्स, ६७२, नारायण पेठ, पुणे - ४११०३०

पुस्तकामागची गोष्ट





संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील महारथी

महाराष्ट्राच्या हीरक महोत्सवानिमित्ताने रौप्य महोत्सवी आठवण

१ मे २०२० रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला साठ वर्षे पूर्ण झाली. कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे हीरक महोत्सवाची सांगता साजरी करता आली नाही. मात्र महाराष्ट्र राज्याच्या रौप्य महोत्सवात प्रकाशित केलेल्या आणि मनोविकासला एक चांगली प्रकाशन संस्था म्हणून ओळख मिळवून देणाऱ्या एका

पुस्तकाच्या आठवणीला आम्ही या निमित्ताने उजाळा देऊ इच्छितो. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील महारथी' हे माधव गडकरी यांचे पुस्तक मनोविकासने प्रकाशित केलं होतं. ज्येष्ठ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांची प्रस्तावना लाभलेल्या आणि कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या हस्ते प्रकाशित झालेल्या या 'पुस्तकामागची गोष्ट' महाराष्ट्राच्या हीरक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सांगत आहेत अरविंद पाटकर...

अनेक रथी–महारथींच्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे आजचा संयुक्त महाराष्ट्र साकारलेला आहे. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील अशा महारथींच्या शौर्याची गाथा नव्या पिढीसमोर ठेवली पाहिजे. हाच विचार करून महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण होत असताना माधव गडकरी यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेत्यांची ओळख करून देणारं एक सदर लोकसत्तामधून चालवलं होतं. त्याचं पुस्तक मनोविकास प्रकाशनाने १ मे १९८७ रोजी प्रकाशित केलं होतं. त्या पुस्तकामागची ही गोष्ट.

माधव गडकरी हे सर्वसामान्यांच्या जगण्याशी आपल्या लेखणीद्वारे स्वत:ला जोडणारे आणि म्हणूनच मोठा वाचकवर्ग लाभलेले ज्येष्ठ पत्रकार, संपादक होते. त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक विषयांना वाचा फोडली. अन्याय, अत्याचारग्रस्त पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी आपली लेखणी चालवली. 'चौफेर' या आपल्या साप्ताहिक सदराच्या माध्यमातून तर त्यांनी सामान्यांच्या अनेक प्रश्नांची दखल घ्यायला प्रशासनाला भाग पाडलं. इतकंच नव्हे, तर अनेकांचे

विस्कटलेले संसार उभे केले. लोकांसाठी तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठिशी ते खंबीरपणे उभे राहिले. वेळप्रसंगी ते सामान्यांसाठी रस्त्यावरही उतरले. त्यामुळे सामान्य माणूस, चळवळीतले कार्यकर्ते त्यांच्या लेखणीशी जोडले गेले होते. मीही त्यापैकीच एक होतो. किंबहुना कार्यकर्ता म्हणून मला त्यांच्या अधिक जवळ जाता आलं.

गडकरी त्यावेळी मुंबई सकाळचे संपादक होते तेव्हा त्यांनी लालबागमधल्या बॉंबे गॅस कंपनी विरोधातल्या आमच्या आंदोलनाची स्वत:हून दखल घेतली होती. या कंपनीच्या धुरामुळे लालबाग परिसरातल्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागे. त्याविरोधात अनेक तक्रारी देऊनही काही हालचाली होत नव्हत्या. तेव्हा 'नागरिक समस्या निवारण समिती' स्थापन करून आम्ही त्याद्वारे आंदोलन सुरू केलं. कंपनी विरोधात धरणे धरले. मी स्वत: उपोषणाला बसलो. पाच-सहा दिवस हे उपोषण सुरू होतं. त्यानंतर तब्बल नऊ तासांचं रास्ता रोको आंदोलन केलं. तरीही प्रशासनाला जाग येईना. मात्र त्याची दखल सर्वच माध्यमांनी घेतली. विशेष म्हणजे माधव गडकरींनीही ती घेतली. तेव्हा मी त्यांना भेटायला गेलो. त्यांनी अत्यंत आत्मियतेनं कंपनीच्या धुराचा प्रश्न समजून घेतला. त्याविरुद्धच्या आंदोलनाची माहिती घेतली आणि 'आमच्या विभागाला आपण एकदा भेट द्यावी', ही आमची विनंतीही त्यांनी मान्य केली. इतकंच नाही, तर एके दिवशी ते लालबाग परिसराला भेट द्यायला आले. अनेक चाळींमधून फिरले. लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधला आणि एक सभाही घेतली. त्यानंतर त्यांनी 'बॉंबे गॅस कंपनी का जात नाही?' या मथळ्याखाली अग्रलेखही लिहिला.

यातून गडकरी यांच्याशी माझी एक वेगळी ओळख निर्माण झाली. या ओळखीने गडकरी यांना जवळून अनुभवण्याची संधी मला मिळाली. त्यातूनच गडकरींच्या लेखनाचा मी एक नियमित वाचक बनलो आणि पुढे पुस्तकाच्या निमित्ताने आमच्यातला हा ऋणानुबंध अधिक दृढ होत गेला. १९८५ सालातली ही गोष्ट आहे. त्यावेळी माधव गडकरी हे लोकसत्ताचे संपादक होते आणि महाराष्ट्र राज्य स्थापनेचं हे रौप्य महोत्सवी वर्ष होतं. त्या निमित्ताने त्यांचं 'संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील महारथी' हे सदर सुरू होतं. ते मी नियमित वाचत होतो. वा. वि. भट यांच्या मार्गदर्शनाखाली मी प्रकाशन व्यवसायात नुकतंच पाऊल टाकलं होतं. त्यामुळे एका टप्प्यावर या चरित्रात्मक लेखमालेचं एक चांगलं पुस्तक होऊ शकेल असं वाटलं आणि त्याक्षणी गडकरी यांच्या भेटीला गेलो. या भेटीत मनातला विचार बोलून दाखवला आणि लेखी पत्र देऊन पुस्तकाचा प्रस्ताव त्यांच्या समोर ठेवला. एका क्षणाचाही विलंब न लावता ते म्हणाले,

'हो. नक्कीच याचं पुस्तक होऊ शकतं आणि आपण ते चांगल्या पद्धतीने करूयात. तुम्ही ते प्रकाशित करायला माझी काहीच हरकत नाही. काही लेख अद्याप बाकी आहेत. ते लिहून झालं की सारे लेख आपल्या हाती सोपवतो.'

खरं सांगायचं तर माधव गडकरी हे श्रीविद्या प्रकाशनाचे लेखक होते आणि या व्यवसायात त्यावेळी मी अत्यंत नवखा होतो. असं असताना गडकरी यांनी त्यांचं पुस्तक प्रकाशित करण्याची संधी मला दिली. बोलल्याप्रमाणे काही दिवसांनंतर लेखांचं बाड घेऊन ते स्वत: माझ्याकडे आले. आकाशवाणी आमदार निवासाच्या आवारात मी

मनोविकास बुक सेंटर या नावाने टेबलावर पुस्तकं मांडून ती विकायचो. तिथे ते अधून–मधून चक्कर टाकायचे. हे बुक सेंटर कायमस्वरूपी इथे सुरू राहावे या माझ्या प्रयत्नांना अनेकांनी साथ दिली. त्यात माधव गडकरीही होते. त्यामुळे माझ्या भेटीचं हेच ठिकाण असल्याचं त्यांना माहीत होतं. त्यामुळे ते तिथं आले. म्हणाले,

‘पाटकर, हा घ्या पुस्तकाचा मजकूर. आपलं बोलणं झाल्याप्रमाणे मी तो तुमच्याकडे सोपवतो आहे. तुम्ही या व्यवसायात नवे आहात. तेव्हा काहीही लागलं तर नि:संकोच सांगा.’

मी ते बाड हाती घेतलं. खरं सांगायचं तर माझा उर त्यावेळी भरून आला होता. त्यामुळे मला त्यांच्याशी फार काही बोलता आलं नाही. त्यावेळी मनोविकास प्रकाशनाचं स्वतंत्र असं ऑफिस नव्हतं. त्यामुळे कुठलाच सेटअप नव्हता. सारी कामं बाहेरून करून घ्यावी लागायची. त्यादृष्टीनं मी पुढच्या तयारीला लागलो. लेख टंकलिखित करून घेणं, प्रूफं तपासणं असं काम सुरू केलं. अच्युत पालव हा आमच्या लालबागमधलाच चित्रकार. मला तो नेहमी मदत करायचा. त्याला या पुस्तकाचं मुखपृष्ठ करायला दिलं. त्याने ते अत्यंत उत्तम केलं.

हे सारं सुरू असताना माधव गडकरी प्रत्यक्ष भेटून किंवा मला लोकसत्तेत बोलावून घेत प्रगती विचारायचे. पुस्तकाचं काम बरंच पुढे गेल्यानंतर प्रकाशन समारंभाचा विषय पुढे आला. या पुस्तकाला संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील एक प्रमुख नेते एस. एम. जोशी यांनी प्रस्तावना दिली होती. त्यामुळे तितक्याच तोलामोलाच्या व्यक्तीच्या हस्ते या पुस्तकाचं प्रकाशन व्हावं असं आम्हा दोघांनाही वाटत होतं. मी कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचं नाव सूचवलं. अर्थात

त्यावर गडकरींची पहिली प्रतिक्रिया नकारात्मक होती. ते म्हणाले,

‘कॉ. डांगे हे नाव तसं मोठंच आहे. परंतु ते कार्यक्रमाला येणार नाहीत. हे मी अनुभवावरून तुम्हाला सांगतो.’

‘आपण एकदा भेटून तरी बघू. मला विश्वास आहे, की ते या कार्यक्रमाला नाही म्हणणार नाहीत.’ असं मी थोड आग्रहाने म्हणालो. गडकरी तयार झाले. मग कॉ. डांगे यांच्या घरी फोन करून त्यांच्या भेटीची वेळ ठरवली. त्यावेळी ते दादरच्या प्रितम हॉटेल समोरच्या इमारतीत राहायचे. हृदयविकाराचा त्रास सुरू झाल्यानंतर शरद पवार यांनी त्यांना ही जागा मिळवून दिली होती. ठरल्याप्रमाणे गडकरी यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार पुष्पा त्रिलोकेकर, सा. लोकप्रभाचे संपादक प्रदीप वर्मा व मी असे चौघेजण गडकरी यांच्या फियाट गाडीतून कॉ. डांगे यांच्या घरी गेलो. माधव गडकरी यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली. कॉ. डांगे म्हणाले,

‘कोण काढतंय हे पुस्तक ?’

‘हा तुमचा कार्यकर्ता.’ गडकरी यांनी माझ्याकडे बोट करत माहिती दिली.

‘अच्छा, हा तर आमचा लालबागचा गुंड. मी येणार मग या प्रकाशनाला.’ कॉ. डांगे यांनी क्षणाचाही विलंब न लावता होकार दिला. गिरणी कामगार युनियनचा कार्यकर्ता म्हणून मी अनेकदा कॉ. डांगे यांना भेटलो आहे. माझ्या तीन कार्यक्रमांना ते आले होते. त्यांनी मला कधीच कोणत्या गोष्टीसाठी नकार दिला नाही. किंबहुना तरुणांना प्रोत्साहन देण्याचं काम त्यांनी अखेरपर्यंत केलं. त्याच भावनेतून ते माझा उल्लेख नेहमीच ‘आमचा लालबागचा गुंड’ असा करत. ही मला त्यांनी दिलेली

पदवी होती. एका कार्यकर्त्याचा तो सन्मान होता. त्यामुळे कॉ. डांगे यांच्याकडून माझा असा सन्मानपूर्वक उल्लेख होणं आणि प्रकाशनासाठी तात्काळ होकार देणं या दोन्ही गोष्टींमुळे गडकरी आश्चर्यचकित झाले होते.

कॉ. डांगे यांच्या होकारानंतर माझ्यासह माधव गडकरीही कामाला लागले. मी कागद, प्रिंटींग, बांधणी यात गुंतलो, तर गडकरी प्रकाशनपूर्व प्रसिद्धीत गुंतले. माझ्यासारखा नवखा प्रकाशक असूनही त्यांनी प्रसिद्धीच्या पातळीवर सर्व प्रकारची मदत केली. प्रकाशन समारंभाची पत्रिका बनवण्यापासून काही मान्यवरांना निमंत्रणं देण्यापर्यंत त्यांनी अनेक गोष्टीत पुढाकार घेतला. कार्यक्रमासाठी आम्ही गिरगावातील साहित्य संघ मंदिराचा हॉल घेतला होता. सारी तयारी अगदी नियोजनाप्रमाणे झाली होती.

कार्यक्रमाला काही दिवस बाकी असताना माधव गडकरी एके दिवशी अचानक मनोविकास बुक सेंटरवर आले आणि तणतण करत म्हणाले, ‘पाटकर मी तुम्हाला सांगत होतो, कॉ. डांगे येणार नाहीत म्हणून. आता ते म्हतायत, मी नाही येणार. मला काहीच माहिती नाही. पत्रिका वगैरे छापून झाल्यानंतर हे असं कसं काय म्हणू शकतात?’

मी गडकरींना शांत करत म्हणालो, ‘कॉ. डांगे यांना कार्यक्रमाला घेऊन येण्याची जबाबदारी माझी. ते जर खरोखरच आले नाही, तर मी प्रकाशन व्यवसाय बंद करीन.’ अर्थात गडकरी यांचा कॉ. डांगे यांच्यावर विश्वास नव्हता. त्यांना अगोदर आलेले अनुभवही तसेच होते. त्यामुळे मी सारी जबाबदारी घेतल्यानंतरही त्यांनी कॉ. डांगे यांना पर्याय म्हणून मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राम जोशी आणि एक

प्रसिद्ध लेखक अशा दोन वक्त्यांना सांगितले होते. अर्थात कॉ. डांगे आपल्या प्रकाशनाला येणार याची मला खात्री होती. कदाचित वयोमानामुळे ते या कार्यक्रमाविषयीचं बोलणं विसरून गेले असावेत म्हणून ते गडकरींना तसे बोलले असतील. कारण त्यावेळी त्यांचं वय ८५ वर्ष इतकं होतं. मी पुन्हा एकदा त्यांना भेटायला गेलो. कार्यक्रमाची आठवण करून दिली. त्यावर ते लगेच म्हणाले, 'अरे हो, तुझा कार्यक्रम आहे ना. मी येणार.'


आणि ठरल्याप्रमाणे कॉ. डांगे कार्यक्रमाला आले. त्यांच्या सोबत त्यांची मुलगी रोझा देशपांडे याही होत्या. सभागृह तुडुंब भरलेलं होतं. कॉ. डांगे यांचा चाहता वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता. गडकरी यांचाही एक चाहता वर्ग होता तोही उपस्थित होता. शिवाय कामगार युनियनचे कार्यकर्ते, संयुक्त महाराष्ट्र लढ्याशी जोडले गेलेले लोक अशा विविध स्तरातला वाचक वर्ग तिथे उपस्थित होता.

पुस्तकाच्या रितसर प्रकाशनानंतर कॉ. डांगे बोलायला उभे राहिले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीविषयी ते भरभरून बोलले. संपूर्ण सभागृह त्यांच्या भाषणाने जणू मंत्रमुग्ध झाले होते. श्रीविद्या प्रकाशनाचे मधुकाका कुलकर्णी खास या कार्यक्रमासाठी पुण्याहून आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनी मला कडकडून मिठी मारली आणि विचारलं,

'तू हे कसं काय जमवलं? कॉ. डांगे सहसा अशा कार्यक्रमाला जात नाहीत. मी तर त्यांना अनेकवेळा बोलावलं आहे, पण ते माझ्या एकाही कार्यक्रमाला आले नाहीत. आणि तुझ्या या कार्यक्रमात तर त्यांनी या वयातही उभं राहून भाषण केलं. अगदी मोकळेपणाने ते इथे बोलले. कसं काय हे साधलंस?'

खरं तर या प्रश्नाचं उत्तर माझ्याकडेही नव्हतं. कदाचित संयुक्त महाराष्ट्र चळवळीशी संबंधीत हे पुस्तक असल्याने ते आले असावेत. कारण या चळवळीत त्यांची भूमिका आणि सहभाग महत्त्वाचा राहिलेला आहे. किंवा माझ्यासारख्या कार्यकर्त्याला ते नेहमीच प्रोत्साहन देत आले आहेत. त्या भावनेतूनही ते आले असावेत.

कारण काहीही असलं तरी कॉ. डांगे यांच्यामुळे या कार्यक्रमाला एक वेगळीच उंची मिळाली. लोकसत्ताच्या प्रतिनिधीने ‘आमचे लाडके डी’ या मथळ्याखाली त्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे दिले. अर्थात यात माधव गडकरी यांचंही मोठं योगदान राहीलं आहे. नवखा प्रकाशक असूनही त्यांनी माझ्याकडे हे पुस्तक सोपवलं. मला वाटतं त्यामागेही त्यांची काही भूमिका असली पाहिजे. त्यांनी या पुस्तकाचं सारं मानधन डॉ. दत्ता सामंत यांनी पुकारलेल्या आणि दीर्घकाळ चाललेल्या गिरणी कामगार संपात सहभागी झालेल्या काही महिलांना मदत म्हणून दिले. पत्रकार, लेखक म्हणून गडकरी सर्वांहून वेगळे ठरतात ते याचमुळे असं मला वाटतं. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची पार्श्वभूमी आणि त्याला सामाजिकतेची जोड यामुळे हे पुस्तक खऱ्या अर्थानं एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरलं. त्याचमुळे या पुस्तकाने मनोविकासला एक प्रकाशन संस्था म्हणून खऱ्या अर्थाने ओळख मिळवून दिली. म्हणूनच या पुस्तकामागची ही गोष्ट महत्त्वाची आहे असं वाटतं.




जे. कृष्णमूर्ती आणि कृष्णमूर्ती स्कूल्स

हेरंब कुलकर्णी

पृष्ठ संख्या २१६ । मूल्य २२० रुपये

विद्यार्थी, शिक्षक व पालक याचं
शिक्षणविषयक आकलन उंचवणारं पुस्तक

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=312



आमच्या शिक्षणाचं काय?

हेरंब कुलकर्णी

पृष्ठ संख्या २८४ । मूल्य २९० रुपये

महाराष्ट्रातील २0 जिल्ह्यांत प्रत्यक्ष फिरून
शालाबाह्य मुलांचे वास्तव मांडणारा लेखाजोखा


पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=79


भूमिका



शिक्षक-पालकांच्या जाणीव जागृतीसाठी...

एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन आणि मूलभूत स्वरुपाची, व्यापक अशी भूमिका घेऊन एक धडपड्या, चळवळ्या शिक्षक वाचकांच्या शिक्षणविषयक जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात म्हणून काही पुस्तकांचं झपाटल्यागत लेखन करतो. तितक्याच आत्मियतेने एक प्रकाशक आग्रहपूर्वक ती पुस्तके प्रकाशित करतो आणि अमूल्य असा ठेवा वाचकांच्या हाती पडतो. अशा मनोविकासने प्रकाशित केलेल्या चार शिक्षणविषयक पुस्तकांच्या लेखनामागची प्रेरणा आणि भूमिका मांडणारा लेखक हेरंब कुलकर्णी यांचा हा लेख खास शिक्षक दिनानिमित्त आपल्यासाठी...





मनोविकास प्रकाशनाने माझी 'परीक्षेला पर्याय काय ?', 'आमच्या शिक्षणाचे काय ?', 'जे कृष्णमूर्ती आणि कृष्णमूर्ती स्कूल्स', 'शिक्षकांसाठी साने गुरुजी' ही शैक्षणिक पुस्तके प्रसिद्ध केली. या पुस्तकांद्वारे मला थेट शिक्षक – पालकांपर्यंत पोहोचता आलं. मनोविकासचं वैशिष्ट्य हे की जेव्हा मी अगदी लेखनात नवखा होतो, तेव्हा ही पुस्तके प्रसिद्ध केली. अनेकदा सामाजिक अंगाने लिहिलेली पुस्तके फार विक्री होत नसल्याने स्वीकारली जात नाहीत परंतु 'आमच्या शिक्षणाचे काय ?'सारखे वंचितांच्या शिक्षणावरचे पुस्तक प्रसिद्ध केले.

माझ्या चारही पुस्तकांचे विषय तसे अगदीच वेगळे आहेत. परीक्षेत नापास झाल्यामुळे चार हजार विद्यार्थी दरवर्षी आत्महत्या करतात. त्यामुळे परीक्षेच्या पद्धतीत बदल व्हायला हवा असं सर्वजण त्या काळात मांडत होते. परीक्षा इतकी जीवघेणी नसावी यावर सर्वांचं एकमत असलं तरी परीक्षा पद्धतीत नेमकी सुधारणा काय हवी ? याबाबत मात्र ठोस पर्याय समोर येत नव्हते. अशा काळात मला वाटले, की शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, विविध प्रयोगशील शाळा यांच्याशी बोलून मग आपण निष्कर्षाला

यायला हवे. यातून परीक्षेच्या पर्यायांवर चर्चा करणारे हे पुस्तक साकारले. या पुस्तकाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील विविध तज्ज्ञांचे लेख या पुस्तकात आले. त्याचप्रमाणे जे कृष्णमूर्ती, विनोबा अशा मान्यवरांचे विविध उतारे, परीक्षेवरील व्यंगचित्रं, कविता, परीक्षेत आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांच्या मुलाखती अशी सर्वांगीण चर्चा झाली आहे. शेवटच्या भागात प्रयोगशील शाळा व वेगवेगळे शिक्षक परीक्षा कशी घेतात? याचा सविस्तर एक विभाग पुस्तकात केल्याने ती केवळ चर्चा न होता उत्तरांच्या दिशेने हे पुस्तक गेले. या पुस्तकाला राज्य शासनाचा उत्कृष्ट संपादनाचा पुरस्कार मिळाला.

'आमच्या शिक्षणाचे काय?' हे पुस्तक मला सक्तीच्या शिक्षण कायद्यानंतर लिहावे लागले. २०१० ला सक्तीचा शिक्षण हक्क कायदा आला तेव्हा असे वाटले त्या सर्वांवर सक्ती होईल व एकही मूल शाळेबाहेर राहणार नाही. पण दोन वर्षातच हा कायदा प्रभावहीन झाला. शालाबाह्य मुले तशीच शाळेबाहेर राहिली. मुख्य बाब म्हणजे शालाबाह्य मुले ही दलित आदिवासी भटके यांचीच असतात. तेव्हा व्यवस्थेने ज्यांना शतकानुशतके शिक्षणापासून दूर ठेवले त्यांनाच आज आम्ही पुन्हा शिक्षणापासून वंचित ठेवतो आहे. याच अस्वस्थतेतून या पुस्तकाची कल्पना सुचली. शाळाबाह्य मुलांची संख्या सांगून शासनावर दडपण निर्माण होणार नाही, तर प्रत्यक्ष त्या मुलांचे हाल व दु:ख मांडली पाहिजेत असे वाटले. त्यातून मी १९ जिल्ह्यात फिरलो. प्रत्यक्ष मुलांची स्थिती, या मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थांचे प्रयत्न, शाळाभेटी, शिक्षकांच्या मुलाखती व शेवटी त्या विषयावर आलेले वेगवेगळे अहवाल





आकडेवारी व उपाय अशा प्रकारे प्रत्येक प्रकारच्या शालाबाह्य मुलांचा प्रश्न यात मांडला. बालकामगार, वेश्यांची मुले, उसतोडी कामगार, वीटभट्टी मजूर, दगडखाण कामगार, प्लॅटफॉर्मवरील मुले, बालविवाह होणाऱ्या मुली, मुस्लीम मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, शहरी झोपडपट्टीत असणाऱ्या मुलांच्या समस्या, भटक्याविमुक्तांच्या शिक्षणाचा प्रश्न, आश्रम शाळा इतका व्यापक परीघ या पुस्तकात आहे. त्यातून वंचित मुलांविषयी संवेदना निर्माण व्हायला नक्कीच मदत झाली.

भारतात १०० विद्यार्थ्यांत फक्त २६ विद्यार्थी उच्च शिक्षणात पोहोचतात. ही गळती होणारी मुलं ही वंचित समूहांतील असतात. या गळतीचे कारण हे केवळ गरिबी नसून मुलांना लेखन – वाचन क्षमता प्राप्त नसतात हे आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच शालाबाह्य मुलांचा प्रशन सोडवायला दीर्घकालीन उत्तर आहे, हे पुस्तकाचे मुख्य सूत्र आहे.

यानंतरचे ‘जे कृष्णमूर्ती आणि कृष्णमूर्ती स्कूल्स’ हे पुस्तक अगदीच वेगळे आहे. कृष्णमूर्तींच्या प्रेरणेने भारतात व जगात अनेक शाळा स्थापन झाल्या.

त्यांची पुस्तके शिक्षणावर आहेत परंतु मला नेहमी हे जाणवायचे की शिक्षक समुदायाला कृष्णमूर्तींविषयी माहिती नाही. असे का व्हावे? तर डीएड, बीएड अभ्यासक्रमात शिक्षणतज्ज्ञ म्हणून कृष्णमूर्तींचा कुठेच परिचय नाही. शिवाय कृष्णमूर्तींनी प्रामुख्याने इंग्रजीत लिहिल्याने ते फारसे पोहोचले नाहीत. तेव्हा कृष्णमूर्तींचा शिक्षणविषयक विचार व प्रत्यक्ष शाळाविषयीची माहिती असे एकत्रित पुस्तक लिहून शिक्षक समुदायाला कृष्णमूर्ती परिचित करून द्यावे असे वाटले. त्यादृष्टिकोनातून कृष्णमूर्तींची ८० पेक्षा जास्त पुस्तके वाचली. त्यातील शिक्षणविषयक विचारांचे संकलन करून पुस्तकाचा पहिला भाग लिहिला.

भारतातील राजघाट (उत्तर प्रदेश) द व्हॅली स्कूल (कर्नाटक) सह्याद्री स्कूल (महाराष्ट्र) ऋषी व्हॅली स्कूल (आंध्रप्रदेश) द स्कूल (तामिळनाडू) या ठिकाणी जाऊन भेटी दिल्या. प्रत्यक्ष त्या शाळांमध्ये किमान आठवडाभर राहिलो व शिक्षक समुदायाला जी उत्सुकता असते ती विचारात घेऊन प्रत्यक्ष अध्यापनाचे काम कसे चालते याचे तपशील जमवले. त्यात त्या शाळांचे वेळापत्रक, अभ्यासक्रम, परीक्षा, चाचणी, स्नेहसंमेलन, शिक्षक-विद्यार्थी संबंध, क्रीडा, कला, संगीत यांचा समावेश होता. शिक्षक कसे निवडले जातात? शिक्षकांचे प्रशिक्षण? अशा अनेक मुद्द्यांची तपशीलवार माहिती गोळा करून पुस्तकात मांडली. शेवटी या शाळांकडून आपण काय घेऊ शकतो? अशी उपाययोजना मांडली. त्यातून कृष्णमूर्तींचे तत्वज्ञान प्रत्यक्ष शाळांच्या व शिक्षक-पालकांच्या पातळीवर अमलात आणण्याच्या दृष्टीने उपयुक्त असं पुस्तक होऊ शकलं. या पुस्तकाला राज्य शासनाचा

उत्कृष्ट साहित्य पुरस्कारही मिळाला.

शेवटी मी सानेगुरुजीपाशी येऊन थांबलो. महाराष्ट्रातील शेकडो शाळा बघितल्या. शिक्षणावर खूप लिहिले. खूप टीका केली. शासनाच्या समित्यांवर काम केले, उपाययोजना सुचवल्या, पण तरीसुद्धा शिक्षणक्षेत्र केवळ कायद्याच्या धाकाने बदलणार नाही असे वाटू लागले. शिक्षकांमधील स्वयंप्रेरणा जागी करणे हेच त्याचे उत्तर आहे. याच काळात मी अंमळनेरला गेलो. तेथे साने गुरुजींची राहण्याची खोली बघितली. माझे मन भरून आले आणि त्याक्षणी जाणवले साने गुरुजींना आपण गुरुजी म्हणतो परंतु त्यांनी शिक्षक म्हणून जे काम केले ते आपल्याला कुठे माहीत आहे? त्यानंतर गुरुजींविषयी वाचत गेलो. तेव्हा लक्षात आले, की साने गुरुजींनी शिक्षक म्हणून जे काम केले, प्रयोग केले, विद्यार्थ्यांवर टोकाचे प्रेम केले ते फारसे शिक्षक समुदायापर्यंत पोचले नाही. तेव्हा फक्त सानेगुरुजींची शिक्षक ही प्रतिमा समोर ठेवून पुस्तक लिहावे व आपण गुरुजींपासून काय प्रेरणा घेऊ शकतो अशी मांडणी करावी जेणेकरून शिक्षक समुदायात सानेगुरुजी ही प्रेरणा पुन्हा नव्याने जागी होईल असे वाटले.

मग त्यासाठी पुन्हा अमळनेर, साने गुरुजींचे जन्मस्थान पालगड. साने गुरुजी स्मारक माणगाव अशा ठिकाणी जाऊन आलो. साने गुरुजींवर प्रसिद्ध झालेली सर्व ३५ पुस्तके मिळवून वाचली. गुरुजींच्या जिवंत असलेल्या दोन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. अनेकांशी बोललो व त्यातून शिक्षकांसाठी साने गुरुजी हे पुस्तक लिहिले. सुरुवातीला गुरुजींच्या व्यक्तिमत्वाची मांडणी करून पुस्तकाच्या उत्तरार्धात आपण शिक्षक म्हणून गुरुजींपासून काय प्रेरणा

घ्यावी, साने गुरुजींसारखे आपण लोकशिक्षक कसे बनावे, गुरुजींसारखे व्यासंगी कसे व्हावे, यासाठीचे अनेक पैलू मांडले. गुरुजींचे केवळ व्यक्ती म्हणून महात्म्य मांडण्यापेक्षा आजच्या परिस्थितीत गुरुजींच्या प्रेरणेने आपण कसे काम करू शकतो यावर जास्त भर दिला. त्यातून अनेक शिक्षकांना सानेगुरुजींची नेमकी ओळख झाली व प्रेरणा मिळाली. तसे पुस्तक वाचल्यानंतर अनेकांनी सांगितले. विद्यार्थ्यांना नवी माहिती मिळावी म्हणून साने गुरुजी रोज आठ पानांचे भित्तीपत्रक चालवायचे. त्यासाठी आदल्या दिवशी एक तास वाचन व पहाटे चार ते सहा भित्तीपत्रकांचं लेखन असे ते दोन वर्षे करत होते. हा तपशील वाचल्यानंतर अनेक शिक्षक शहारले. असे समर्पण असणाऱ्या गुरुजींच्या महाराष्ट्रात आपण असे वेगळे काम करायला हवे अशी प्रेरणा जागृत झाली.

अशी पुस्तके नेमका काय परिणाम साधतात? याचा मी नेहमी विचार करतो. तो परिणाम मूर्त स्वरुपात दिसत नाही, पण शिक्षकांच्या व पालकांच्या जाणीव जागृतीला त्यांचा नक्कीच उपयोग होतो. राज्यात शालाबाह्य मुलांचे सर्वेक्षण शासनाने केले. त्यावर समाजात चर्चा झाली व त्या विषयावर तीव्र प्रतिक्रिया आल्या हा अप्रत्यक्ष परिणाम असतो. परीक्षा पद्धतीत बदल आता झाला पण या बदलाची मनोभूमिका किंवा पूर्वतयारी करण्याचे काम या पुस्तकाने केले. कृष्णमूर्ती शाळांविषयी उत्सुकता जागली आहे हे जाणवते. अनेकजण कृष्णमूर्ती आणि त्यांचे जगावेगळे विचार याविषयी खूप भरभरून बोलतात. आपल्या मराठी शिक्षण परिघात ते परिचित झालेत हे समाधान मोठे आहे. साने गुरुजींचे हे रूप आम्हाला नवीन आहे.

असे फोन तर येतात पण गुरुजींच्या स्मरणाने अनेकजण रडताना मी अनुभवले. इतकी जादू साने गुरुजींची शिक्षक समुदायावर आहे.

कृष्णमूर्ती आणि साने गुरुजी यांचा नव्याने परिचय मराठी वाचकांना मला करून देता आला याचे समाधान मोठे आहे. आज शिक्षक समुदायात जागृती वाढली आहे. शाळेत प्रयोग करावेत आणि आपली शाळा उपक्रमशील बनवावी अशी आकांक्षा असते. अशा शिक्षकांना ही पुस्तके खूप जवळची वाटतात. असे शिक्षक श्रद्धेने वाचतात. साने गुरुजींनी अशा शिक्षकांना त्यांच्या अंतरात्म्याला साद घातली आहे. आजच्या काळात प्रशासन शिक्षकांना बदलायला असमर्थ ठरते आहे. समाजाचे दडपणही प्रभावहीन आहे. अशावेळी असे महापुरुष प्रेरक दीपस्तंभ म्हणून शिक्षक समुदायाला बदलू शकतात हे यां पुस्तकांचे औचित्य आहे.

चारही पुस्तकांचे विषय नक्कीच वेगळे आहेत परंतु महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जाताना किंवा व्याख्यानांच्या निमित्ताने फिरताना अनेक जण वाचलेल्या पुस्तकांची यादी सांगतात. त्यात मनोविकासच्या या पुस्तकांची नावे असतात. त्यातून या पुस्तकांनी आपली शिक्षणविषयक धडपड, विचार, अपेक्षा गावागावापर्यंत पोहोचवली आहे हे लक्षात येते व मनोविकासविषयी कृतज्ञता वाटत राहते...



शिकू या आनंदे

रेणू दांडेकर

पृष्ठ संख्या १३६ । मूल्य १२० रुपये

‘ज्ञानरचनावाद’ या नव्या संकल्पनेचा घेतलेला वेध

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=460



खऱ्या शिक्षणाच्या शोधात

डेव्हिड ग्रिबल

अनुवाद : वृंदा चापेकर

पृष्ठ संख्या ३८४ । मूल्य ३५० रुपये

जीवनमूल्य उंचावणाऱ्या शाळांविषयी

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=344



प्रिय मुख्याध्यापक


शंकर मुसाफिर

अनुवाद : डॉ. प्रदीप गोटुस्कर

पृष्ठ संख्या १०० । मूल्य १२० रुपये

अर्थपूर्ण, प्रभावी शिक्षणासाठी कल्पक उपाययोजना

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&product_id=208



प्रिय बाई,

बार्बियानाची शाळा

अनुवाद : सुधा कुलकर्णी


पृष्ठ संख्या १३६ । मूल्य १२० रुपये

आपल्याला अंतर्मुख करायला भाग पाडणारं मुलांचं दीर्घ पत्र.

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=441

संवाद





शिक्षण म्हणजे ‘ट्यूशन’ नव्हे, तर ‘मिशन’ आहे

देवेंद्र कांदोळकर

सर्वोदयी विचारांनी भारलेला गोव्यातील एक शिक्षक स्वेच्छा निवृत्ती घेतो आणि २००१च्या भूकंपानंतर मदतकामासाठी कच्छच्या रणात जातो. मैलो न् मैल पायी हिंडत राहतो. तिथल्या नवख्या भाषेशी, संस्कृतीशी जुळवून घेतो आणि वंचित मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न अंगावर घेतो. त्यातून सुरू होते सागरशाळा ही शिक्षणचळवळ. वीस वर्षांच्या या चळवळीतून मुलांच्या काही पिढ्या जशा घडल्या तशाच पद्धतीने स्थानिकांच्या जीवनातही या

चळवळीने परिवर्तन घडवून आणलं. अशा पार्श्वभूमिवर शिक्षक दिनाच्या निमित्ताने त्या शिक्षकाशी म्हणजेच देवेंद्र कांदोळकर यांच्याशी साधलेला हा संवाद...

गुजरातमधील कच्छच्या भूकंपग्रस्त भागात मदतकार्य करत असताना मच्छीमारीसाठी समुद्रकिनारी राहणाऱ्या मच्छीमारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न समोर आला. त्यातून सागरशाळेची कल्पना सूचली आणि त्याची सुरूवात वीस वर्षांपूर्वी शुन्यातून झाली. ...आणि आज सहा ठिकाणी मिळून दरवर्षी किमान साडेचारशे मुले शिक्षण घेत आहेत. त्याची कहानी सागरशाळा या मनोविकासने प्रकाशित केलेल्या पुस्तकात मांडली आहे. ती वाचल्या नंतर आपल्या लक्षात येईल, की एखाद्या शिक्षकाने ठरवलं तर तो केवढं मोठं काम उभं करू शकतो. देवेंद्र कांदोळकर यांनी अत्यंत नेटानं हे काम केलं आणि म्हणूनच आज या परिसरात खूप मोठं परिवर्तन घडून आलेलं आपल्याला पाहायला मिळतं. ते सांगतात,

'सुरुवातीच्या काळात मच्छीमारांच्या झोपड्या-झोपड्यांत जाऊन त्यांना समजावून, मुलांना लाडीगोडी लाऊन शाळेत आणावे लागत होते. आज हे चित्र बदललेले आहे. पावसाळ्यात मच्छीमार आपापल्या गावात असतात. जून महिन्यात पहिल्या इयत्तेत नाव दाखल करण्यासाठी पालक स्वतःहून गावातील शाळेत जातात. कमी वयामुळे शाळेत दाखल करून न घेतलेल्या मुलांना ते सागरशाळेत पाठवतात. आपल्या मुलांना शाळेत घातले पाहिजे ही जाण पालकांत आली आहे, हा एक मोठा बदल आहे. पूर्वी आम्ही मुलांना पाटी पेन्सीलपासून शिक्षणासाठी जे जे लागायचे ते ते

आणून द्यायचो. आपल्या मुलाला पेन्सील जरी कमी पडली तरी काही पालक भांडायला यायचे. याउलट आता पालक स्वखर्चाने आपल्या मुलांना अंकलिपी, गाईड, पेन पेन्सिली आणून द्यायला लागलेत. हा मोठा बदल लोकांमध्ये झालेला आज पाहायला मिळतो.’

– या सागरशाळांच्या माध्यमातून तुम्ही शाळाबाह्य मुलं शिक्षणाच्या कक्षेत आणली, पण त्याचबरोबर पालकांनाही अंधश्रद्धा, भेदाभेद यातून बाहेर काढणारी नवी दृष्टी दिलीत. हे कसं साधलं?

देवेंद्र कांदोळकर – अंधश्रद्धा, धर्म आणि परमेश्वर ह्या तीन बाबींची सरमिसळ होत असल्याने भल्याभल्यांनाही श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सीमारेषा स्पष्ट होत नाहीत तेथे कष्टकरी सामान्य लोकांबाबत तर आणखीनच कठीण. घरात कुणी आजारी पडले तर बुवा–बापूकडून तिर्थरुपाने ‘मंतरलेले पाणी’ आणून देणे, हाता–गळ्यात ताईत बांधायला देणे हे प्रकार सर्वत्र सर्रासपणे होत असतात याला इथले पालकही अपवाद नाहीत. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या या रूढी परंपरेच्या बेड्या सांगून सवरून सोपेपणी तुटत नाहीत. तेव्हा त्यांना ‘दुवा आणि दवा’ दोन्ही करा असा सल्ला देतो. विद्यार्थ्यांना दवाखान्यात न्यायला शिक्षक मंडळी मदत करतात. त्यातून तो बरा झाला की हळूहळू पालकांनाही शिक्षकांचे म्हणणे पटायला लागते. वैज्ञानिक प्रयोग, रस्तानाट्य यासारख्या ऊपक्रमांतून लोकजागृती केली जाते. त्यामुळे बुवा–बापू कशी फसवणूक करतात याची प्रचिती येते आणि हळूहळू आपल्या म्हणण्याला स्वीकृती मिळत जाते. वयस्कर माणसे बदलायला लवकर तयार नसतात. आता मुले

शिकत आहेत, जगात काय चाललंय हे वाचत, ऐकत आहेत. त्यामुळे एखादी गोष्ट घडण्यामागे कार्यकारण भाव काय आहे याची चिकित्सा करण्याची प्रक्रिया जसजशी वाढत जाईल तसतसे अंधश्रद्धा-भेदाभेदांचे प्रमाण कमी-कमी होत जाईल अशी आशा आहे.

– सागरशाळांच्या माध्यमातून आज तिथं नवं काय सुरू आहे?

देवेंद्र कांदोळकर – सागरशाळेत आलेली मुले नुसती साक्षर नव्हे तर भावसाक्षर होऊन समाजात वावरावीत अशी अपेक्षा असते. शिक्षण घेण्यासाठी आपल्याला कितीतरी ज्ञात अज्ञात दात्यांनी मदत केली ही भावना अनेक माजी विद्यार्थ्यांच्या मनात आहे. शिक्षण देण्यास समाजाचा हातभार लागला आहे. हे ऋण समाजाची सेवा करत परत करायचे आहे हे समजून काही तरुण काम करतात. गांवातील छोट्या मोठ्या कामांत सहभागी होतात. अडी-अडचणीला धावून जातात. शासनदरबारी विनंती करून काम होत नसले तर नियम, कायदे यांचा आधार घेत आपले हक्क मिळवण्यासाठी ते प्रयत्न करू लागले आहेत .

एका गांवातील मुख्याध्यापक एका मुलाचे नांव दाखल करत नव्हते. सागरशाळेच्या माजी विद्यार्थ्यांने मुख्याध्यापकांना विनवून बघितले, तरी काम झाले नाही. तेव्हा त्याने सरळ तालुका शिक्षणाधिकाऱ्यांना अर्ज केला. तिसऱ्या दिवशी मुख्याध्यापकांनी निरोप पाठवून पालकाला बोलावून घेऊन त्या मुलाची नावनोंदणी केली. दुसऱ्या एका गावातील समुद्र किनाऱ्यावर तीन चार दिवसांपासून पिण्याचे पाणी येत नव्हते. एका माजी विद्यार्थ्याने ईमेलद्वारे तालुका पंचायत समितीकडे तक्रार केली. लगेच चक्रे फिरली.

तालुका पंचायत समितीकडून ग्रामपंचायतीत फोन आला. पाण्याचा प्रश्न लगेच सुटला.

पूर्वी निरक्षरतेमुळे लोकांना अर्ज लिहिता येत नव्हते. लहान सहान कामासाठी गावच्या पुढाऱ्यांकडे अजीजी करावी लागायची. पैसे खर्च करुन त्यांना सरकार दरबारी घेऊन जावे लागायचे. आत हीच कामे आपली मुले घरबसल्या मोबाईलवरून करत असलेली पाहून पालकांना शिक्षणाचे महत्व समजायला लागले आहे. येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीत सागरशाळेत शिकून बाहेर पडलेल्या तरुणांनी भाग घ्यावा असे लोक आता सुचवू लागले आहेत.

– शिक्षकाने ठरवलं, तर तो समाजात खूप मोठा बदल घडवून आणू शकतो. आजच्या शिक्षकांकडे तुम्ही कसे बघता?

देवेंद्र कांदोळकर – पाठ्यपुस्तकातील पाठ शिकविण्यापूरते मर्यादित काम शिक्षकाचे नसते. ते शिक्षण विद्यार्थी आता ङ्गगाईड’ वाचून घरबसल्या मिळवू शकतात. तेव्हा शिक्षण म्हणजे ‘ट्यूशन’ नव्हे तर देश घडवण्याचं एक ‘मिशन’ आहे हे समजून अध्यापनाचं काम शिक्षकांनी केलं पाहिजे. तसं काम करणारा खूप काही करू शकतो. आपले विद्यार्थी ही आपली मुले आहेत ही भावना मनात बाळगून ज्या शिक्षकांनी काम केले त्यांनी विद्यार्थीच नव्हे तर समाज घडविण्याचे काम केले हे आपण पाहत आलो आहोत. शिक्षणसंस्था म्हणजे ‘व्यवसाय’ किंवा ‘नोकरी’ करण्याचे स्थान नव्हे तर समाज परिवर्तनाचे शक्तीपीठ आहे. स्वराज्याचे सुराज्य व्हावे यासाठी समाजातील जे जे घटक काम करतात त्यात शिक्षकांचीही मोठी जबाबदारी आहे. देश स्वतंत्र

करण्यासाठी कित्येकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले या गोष्टी आपण विद्यार्थ्यांना सांगतो तेव्हा समोरील विद्यार्थ्यांच्या मनात 'आमचे शिक्षक देशासाठी, समाजासाठी काय करतात?' असा प्रश्न पडला तर त्याचे उत्तर नकारात्मक येणार नाही असे आपले काम असायला हवे.

– तंत्रज्ञानाने घडवून आणलेल्या बदलाच्या पार्श्वभूमीवर आजच्या शिक्षकांनी नेमकं काय करायला हवं असं तुम्हाला वाटतं?

देवेंद्र कांदोळकर – तंत्रज्ञानाने फार मोठा बदल घडवून आणला असला तरी अनेक लोक स्वातंत्र्याची पहाट उगवून ७३ वर्षे ऊलटली तरी अंधारातच चाचपडत आहेत. झोपड्यातील लोकांच्या हातांत मोबाईल आला म्हणजे विकास झाला असे नाही. तंत्रज्ञानाने घडवून आणलेल्या बदलाने माझ्याकडे शिकायला येत असलेल्या विद्यार्थ्यांच्या एकंदरीत जीवनमानात बदल झाला का आणि तो झाला नसेल तर त्याची कारणे काय आहेत याचा शोध घेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्याला शक्य होईल तेवढी मदत–मार्गदर्शन केले तरी खूप मोठा बदल होऊ शकतो.

– करोना विषाणूच्या प्रादूर्भावाचा सर्वाधिक परिणाम शिक्षणावर झालेला दिसतो. अशा परिस्थितीत शिक्षकाची भूमिका खूपच महत्त्वाची बनली आहे. याबाबत काय सांगाल?

देवेंद्र कांदोळकर – सुशिक्षित आणि सर्व साधनसामग्रीयुक्त पालकांची मुले मोबाईल फोनवरून आपापल्या परीने शिक्षण घेतील. परंतु ज्यांच्याकडे साधन सुविधा नाही, ज्याचे पालक मार्गदर्शन करू

शकत नाहीत ती मुले ऑनलाईन अभ्यास कसा काय करणार. ही मुले आधीच मागे होती आणि या परिस्थितीत तर आणखीच मागे राहण्याची शक्यता आहे. अशा वेळी शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. योग्य ती खबरदारी घेऊन शिक्षक अधूनमधून विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन मार्गदर्शन करतात. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाला की झालेले नुकसान कसे भरून येईल या दृष्टीने अधिक मेहनत घेत तत्कालीन परिस्थितीनुसार कामाची आखणी करावी लागेल.


– सागरशाळांच्या यशस्वी प्रयोगानंतर शिक्षणाच्या क्षेत्रात सध्या तुमचं काय चालू आहे आणि यापुढच्या काळात तुम्ही काय करू इच्छिता?

देवेंद्र कांदोळकर – सागरशाळांमधून शिकून विद्यार्थी बाहेर पडले. आता पुढे काय असा त्यांच्या समोरचा गहन प्रश्न आहे. पूर्वी शिक्षण नव्हते म्हणून नोकरी नव्हती आज शिक्षण घेतले तरी नोकरी नाही. मग शिकून सवरून काय फायदा असा विचार लोकांत पसरत आहे.

सागरशाळेतील शिक्षक चार अंकी मानधनावर काम करत आहेत. त्यांच्या हाताखाली शिकून गेलेले विद्यार्थी पाच अंकी पगारावर इतरत्र काम करतात. एकदा आमचे एक शिक्षक बसमधून प्रवास करताना त्यांना त्यांचा शाळा अर्ध्यावर सोडलेला विद्यार्थी भेटला. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर शिक्षक म्हणाले, तू शाळा अर्ध्यावर सोडायला नको होतीस. एवढ्यात तू दहावी पास होऊन हायर सेकंडरीत पोचला असतास. बसमधून उतरता– उतरता तो मुलगा म्हणाला, सर, मी शाळा सोडली आणि आता मासे पकडण्यासाठी जातो. महिन्याला किमान पंधरा

हजार मिळवतो. तुम्ही किती कमावता?

त्या मुलाच्या त्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या प्रश्नाने त्या शिक्षकालाच नव्हे तर सागरशाळेला आणि एकूण शिक्षणव्यवस्थेला हादरून टाकले आहे. तो मुलगा महिन्याकाठी आमच्या शिक्षकांपेक्षा जास्त कमावतो हे खरे असले तरी पावसाळ्यात मासेमारी करता येत नाही. उरलेल्या महिन्यातही ह्या ना त्या कारणाने अनेक दिवस व्यवसाय बंद असतो. त्यामुळे जीवतोड करूनही शिल्लक काही राहत नाही. या पार्श्वभूमीवर या लोकांमधील शिक्षणावरचा विश्वास ढळणार नाही ही दक्षता घेत जास्तीत जास्त मुले तांत्रिक-व्यवसायिक शिक्षण घेऊन पुढे कशी जातील हे पाहावे लागेल. सागरशाळेपुढचे हे मोठे आव्हान आहे. त्यादृष्टीने आता काम सुरू आहे.



जिथे मुलांना पंख फुटतात


डॅनियल ग्रीनबर्ग

अनुवाद : नीलांबरी जोशी

पृष्ठ संख्या १८० | मूल्य १८० रुपये

'सॅडबरी व्हॅली स्कूल'
या आगळ्यावेगळ्या शाळेची अद्भुत गोष्ट

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=605



सागरशाळा

देवेंद्र कांदोळकर


पृष्ठ संख्या १५२ | मूल्य १५० रुपये

एका शिक्षणचळवळीची कहाणी!

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=544

अनुवादाच्या
निमित्ताने





जिथे सर्जनशीलतेला पंख फुटतात..!

'फ्री ॲट लास्ट' हे डॅनिअल ग्रीनबर्ग या अमेरिकन विद्वान शिक्षकानं लिहिलेलं पुस्तक. ते 'जिथे मुलांना पंख फुटतात' या नावानं मनोविकास प्रकाशनाने मराठीत आणलं आहे. अमेरिकेतल्या मॅसॅच्युसेटस राज्यातलं सडबरी व्हॅली स्कूल म्हणजे नक्की काय अद्भुत प्रकरण आहे ते सांगणारं हे पुस्तक आहे. त्याचा अत्यंत सुरेख अनुवाद नीलांबरी जोशी यांनी केला आहे. शिक्षक दिनाचं औचित्य साधत या अनुवादाच्या निमित्ताने नीलांबरी जोशी यांनी मांडलेल्या आपल्या भावना खास आपल्यासाठी...

सुमारे १० वर्षांपूर्वीची पुस्तक भिशी या आमच्या ग्रुपची रविवारची एक मैफिल माझ्या आयुष्यात अविस्मरणीय ठरली. मुलांमध्ये विज्ञानप्रसाराचं काम तळमळीनं करणारे अरविंद गुप्ता तिथे आले होते. गुप्ताजींना भारत सरकारच्या पद्मश्रीसह अनेक आंतरराष्ट्रीय मानसन्मान मिळालेले आहेत. त्या संध्याकाळी त्यांनी मुलांसाठी अनुवाद केलेली पुस्तकं, त्यातल्या अनेक गोष्टी सांगितल्या. त्याबरोबरच मुक्तांगण विज्ञानशोधिका केंद्र यांच्या उपक्रमाअंतर्गत ते विज्ञानप्रसारासाठी करत असलेले प्रयत्न कोणते ते सांगितले. त्यात मुख्य म्हणजे विज्ञान, शिक्षण, मानवतावाद, जागतिक सलोखा या विषयांवरची पुस्तकं भारतीय भाषांमध्ये आणण्याच्या त्यांच्या प्रकल्पाविषयी त्यांनी सांगितलं.

तेव्हा मी १२ वर्षं परदेशात राहून भारतात परतले होते. बँकिंग सॉफ्टवेअर तयार करणाऱ्या एका कंपनीत मी तेव्हा प्रोजेक्ट मॅनेजर होते. धावपळ खूप असायची. आयुष्यातल्या चढउतारांमुळेही ते दिवस मानसिक तणावाचे होते. परदेशात जाण्यापूर्वी विज्ञानखेळणी तयार करणाऱ्या एका कंपनीसाठी मी थोडं काम केलं होतं. तेव्हापासून लहान मुलांसाठी यथाशक्ती काही तरी करावं असं मनात होतंच.

या विचारांमधून पुस्तक भिशीच्या आमच्या मीटींगनंतर मी अरविंद गुप्तांना फोन करून, नोकरी चालू आहे, पण मला या क्षेत्रात काय करता येईल? असं विचारलं. तेव्हा त्यांनी फायर ऑफ हिरोशिमा या नावाची एक चिमुकली कथा पाठवली. त्याबरोबर तुझं वाचन चांगलं आहे, तर या कथेचा मराठीत अनुवाद करता येतो का बघ असं त्यांनी सुचवलं. आयुष्यात तो एक निर्णायक क्षण ठरला.

खरं तर अनुवाद या संकल्पनेच्या मी फारशी प्रेमात

नव्हते. एकतर प्रत्येक भाषेला एक लय असते, नाद असतो, तिथल्या प्रदेशाचा एक गंध असतो. लेखकाला एक व्यक्तिमत्व असतं. या दोन्ही गोष्टी पुस्तकात उतरलेल्या असतात. ते सगळं अनुवादात उतरणं अवघड असतं.

पण अनुवादाबद्दलची दुसरी आणि चांगली गोष्ट म्हणजे, जगातली प्रत्येक भाषा, प्रत्येकजण शिकू शकत नाही. मग त्या साहित्याबद्दल आपल्याला माहिती होणं ही गरज कशी पूर्ण होणार? यासाठी अनुवाद खूप महत्वाचा आहे. अनुवादित पुस्तकांबद्दल, अनुवाद करणाऱ्या लेखकांबद्दल आपल्या मनात एक सूक्ष्म का होईना दुजाभाव असतो. पण या दृष्टिकोनातून विचार करून तो दुजाभाव मनातून काढणं गरजेचं आहे. अर्थात, अनुवादित पुस्तकं वाचल्यानंतर वाचकाला मूळ पुस्तकाच्या भाषेबद्दल आत्मीयता निर्माण होऊन त्याला मूळ पुस्तक वाचायची इच्छा निर्माण व्हावी ही अनुवादकर्त्याची जबाबदारी आहे.

याच विचारानं 'फायर ऑफ हिरोशिमा' या कथेचा अनुवाद मी केला. आपल्याला मराठीत अनुवाद करायला चांगलं जमतं आणि लिहायला खूप आवडतं हे दोन महत्वाचे शोध तेव्हा लागले. त्यानंतर जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल या रिचर्ड बाखच्या पुस्तकाचा अनुवाद करताना मीच मला कुठेतरी सापडत गेले. ॲन सॉयर वाईजमन हिने मुलांसाठी घरच्या घरी बनवता येणाऱ्या कौशल्यपूर्ण वस्तूंबद्दल एक पुस्तक लिहिलं आहे. मी त्याचा अनुवाद केल्यावर ते 'चला करू या' या नावानं राजहंस प्रकाशनानं प्रकाशित केलं. त्यानंतर कोसांबी यांच्या नंदीच्या पाठीवर कुबड, मारी क्युरीवरचं एक पुस्तक, रॅटस हे जे बी हल्देन यांचं पुस्तक अशा सुमारे

५०-६० छोट्यामोठ्या पुस्तकांचे/गोष्टींचे अनुवाद त्या दरम्यान मी इंग्रजीतून मराठीत केले. हे बहुतेक अनुवाद इंटरनेटवर फ्री पीडीएफ स्वरुपात उपलब्ध आहेत.

पण माझ्या अनुवाद करण्याच्या कौशल्याचा कस लागला ते पुस्तक म्हणजे डॅनिअल ग्रीनबर्गचं 'फ्री ॲट लास्ट'. या पुस्तकाची सुरुवातीची आवृत्ती बालभवननं प्रकाशित केली. शोभा भागवत यांनी या पुस्तकाचं संपादन करून अनुवाद चांगला झाला आहे असं आवर्जून सांगितलं.

या पुस्तकाच्या त्यानंतरच्या आवृत्त्या 'जिथे मुलांना पंख फुटतात' या नावानं मनोविकास प्रकाशन यांनी प्रकाशित केल्या. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी त्याचं सुंदर मुखपृष्ठ केलं. 'फ्री ॲट लास्ट' हे अमेरिकन विद्वान शिक्षकानं लिहिलेलं पुस्तक आहे. ही शाळा सुरू करून चालवताना त्याला जे बरे-वाईट अनुभव आले त्या प्रत्यक्ष अनुभवांवर हे पुस्तक आधारित आहे. डॅनिअलचा खेळीमेळीनं सगळ्यांशी, विशेषत: लहान मुलांशी वागण्याचा स्वभाव, कामाचा ताण न घेता हसतखेळत काम करणं आणि करुन घेण्याचा स्वभाव त्याच्या पुस्तकातल्या वाक्यावाक्यांमध्ये उतरलेला आहे. एकूण मूळ लेखक बहिर्मुख स्वभावाचा आणि मी अंतर्मुख स्वभावाची. कोणत्याही सार्वजनिक समारंभाला जाणं कसं टाळायचं हा विचार करणं हा माझा हातखंडा आहे. अनोळखी माणसाशी बोलणं वगैरे मला संकट वाटतं.

त्यामुळे डॅनियलचं व्यक्तिमत्व या पुस्तकात उतरवणं मला सोपं नव्हतं. दुसरं म्हणजे, वाक्यं छोटी, सुटसुटीत असली तर वाचकाला कळणं सोपं जातं. 'फ्री ॲट लास्ट' या मूळ पुस्तकात एक वाक्य म्हणजे

एक भलामोठा परिच्छेद होता. पण मी जरा स्वातंत्र्य घेऊन छोटी, सोपी वाक्यं तयार करून अनुवाद केला.


अमेरिकेतल्या मॅसॅच्युसेटस राज्यातलं सडबरी व्हॅली स्कूल म्हणजे नक्की काय अद्भुत प्रकरण आहे ते सांगणारा हा एक परिच्छेद. काहींना लिहायला आवडायचं ते तासन्तास लिहित बसत. काही चित्रकार होते ते चित्रं काढत बसायचे तर काही मातीची मडकी बनवायचे. काहींना स्वयंपाकात रस होता तर काहीजणांना खेळात. ल्यूकला शवविच्छेदनात रस होता. तो शवागारात जाऊन प्रेतं न्याहाळत बसायचा. १५ वर्षाच्या मुलासाठी ही जरा वेगळीच महत्वाकांक्षा होती. त्यानं स्वत:ला अभ्यासात झोकून दिलं होतं. मग आम्ही त्याला जवळच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. पाच वर्षात ल्यूक शवविच्छेदन तज्ज्ञ बनला होता. माझी मुलगी आठ वर्षांची होईपर्यंत वाचत नव्हती. लोकांना आम्ही बेजबाबदार पालक वाटत होतो. पण आमच्या सडबरी शाळेत मात्र सगळे कूल होते. नवव्या वर्षी तिनं वाचायचं ठरवलं. साडेनऊ वर्षांची होईपर्यंत ती नीट वाचायला लागली...! ड्रम वाजवणारा जॉन, मेकअपची आवड जोपासणारी आणि पुढे थिएटर या विषयात पदवी घेणारी जिल... एक ना दोन... अशी असंख्य मुलं सडबरीत शिकली.

सडबरीमध्ये मुलांचं मत लहानपणापासून प्रत्येक गोष्टीत विचारात घेतलं जातं. पर्यायी शिक्षण देणाऱ्या शाळांचे जगभर पूर्वापार जेवढे प्रयत्न झाले त्यात सडबरी वरच्या स्थानावर आहे. ५२ वर्षं चाललेल्या या शाळेच्या धर्तीवर अनेक देशांमध्ये सडबरी स्कूल्स स्थापन झाली आहेत.

पण सडबरीसारख्या पर्यायी शिक्षण देणाऱ्या शाळांबद्दल एक मोठी काळजी पालकांना वाटते. ती

म्हणजे, आमच्या मुलाला पुढच्या आयुष्यात काय करिअर करता येईल? त्यावर हे सडबरीच्या मुलांबाबतचं उत्तर... सडबरीच्या मुलांना त्यांना हव्या असलेल्या कॉलेजमध्ये कायमच प्रवेश मिळाला. कित्येकांना तर विद्यापीठांकडून आमंत्रणं आली. विशेष म्हणजे कोणाकडेच आधीच्या शिक्षणाची गुणपत्रकं, प्रशस्तिपत्रकं नव्हती. पण त्यांच्याकडे यापेक्षा वेगळं काहीतरी होतं. त्यांची आतली उर्जा, स्वबद्दलची प्रखर जाणीव, त्यांचं निश्चित असं ध्येय हे सर्वकाही होतं. त्यांनी ज्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला असेल तिथल्या लोकांना या सगळ्याचं आश्चर्य वाटायचं. अशी स्वतंत्र, जबाबदार आणि आगळीवेगळी मुलं निर्माण करणारी कोणती शाळा आहे? सडबरी व्हॅली स्कूल कुठे आहे असा प्रश्न कायम विचारला जायचा.

मानवाकडे असलेले मूलस्रोत हे निसर्गातल्या मूलस्रोतांसारखेच असतात. ते वरवर सहज दिसत नाहीत, तर खोलवर लपलेले असतात. ते आपल्याला दिसतील अशी परिस्थिती आपण निर्माण करायला हवी. आपण आज ज्या प्रकारे शिक्षण देतो त्यावरून कल्पकता हा मुलांमध्ये असलेला मूलस्रोत आपण शिस्तबद्ध पद्धतीत दडपत चाललो आहोत, असं नुकतंच निधन पावलेले सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंत केन रॉबिनसन यांचं म्हणणं होतं. हे मूलस्रोत शोधून जोपासायचं काम सडबरीसारख्या शाळा करत असतात. अशा पुस्तकाचा अनुवाद केल्याचा मला अभिमान वाटतो, आनंदही होतो. पण याचं सगळं ऋण अरविंद गुप्ता यांनाच आहे.



टीचर

सिल्व्हिया ॲश्टॅन वॉर्नर

अनुवाद : अरुण ठाकूर

पृष्ठ संख्या १९२ | मूल्य २०० रुपये

शिकायची आणि शिकवायची इच्छा असलेल्या
भारतातल्या प्रत्येक व्यक्तीला उपयोगी पडेल अशी
एक जबरदस्त बाईची आणि तिच्या प्रयोगांची ही चरितगाथा.

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=485



शिक्षण प्रवाहाच्या उगमापाशी


सुचिता पडळकर

पृष्ठ संख्या १५४ | मूल्य १८० रुपये

प्रतिभावान शिक्षकेच्या
अनुभवविश्वाचे हृदयस्पर्शी दर्शन

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=696

पुस्तक परिचय





शिक्षणविषयक जाणिवा प्रगल्भ करणारा ठेवा

मुलांचं भावविश्व आणि एकूण जगणं समृद्ध व्हावं याकडे मनोविकास प्रकाशनाने आजवरच्या प्रवासात विशेष लक्ष दिलं आहे. त्यातूनच मुलांसाठीच्या पुस्तकांचं एक वेगळं दालन मनोविकासने निर्माण केलं. त्याला जोड म्हणून शिक्षकांबरोबरच पालकांच्याही शिक्षणविषयक जाणिवा अधिक प्रगल्भ व्हाव्यात म्हणून शिक्षणविषयक पुस्तकांचं आणखी एक दालन मनोविकासने आपल्या ग्रंथभांडारात उभारलं आहे. शिक्षणाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन देणाऱ्या नाविन्यपूर्ण प्रयोगांपासून शिक्षण सहज, सुंदर बनवणाऱ्या प्रयत्नांचा समावेश असणारी अनेकविध पुस्तकं आग्रहपूर्वक प्रकाशित करून हे दालन समृद्ध करण्याचा प्रयत्न मनोविकास

सातत्याने प्रयत्न करत आहे. याच प्रयत्नातून दर्जेदार अशी २२ पुस्तकं आजवर वाचकांना उपलब्ध करून दिली आहेत. यातील काही निवडक पुस्तकांचा पूनम छत्रे यांनी करून दिलेला परिचय शिक्षक दिनाच्या निमित्ताने आपल्यासाठी...

कोविड-१९चं जागतिक संकट पूर्णपणे अनपेक्षित, साथरोगाच्या सर्व गृहितकांना सुरुंग लावणारं आणि भल्याभल्यांना अचंबित करणारं असं आहे. न भूतो न भविष्यति अशा या साथरोगामुळे अनेक क्षेत्रांचं अपरिमित नुकसान झालं, पण त्यातही सर्वाधिक नुकसान झालं आहे ते शिक्षणक्षेत्राचं! 'मुकी बिचारी कशीही हाका' या तत्त्वानुसार विद्यार्थ्यांचा कळवळा येऊन रोज एका नवीन शिक्षणविषयक धोरणाची घोषणा होत आहे. विद्यार्थ्यांना आपापल्या घरात कोंडून ठेवून आपण त्यांना सुरक्षित ठेवत आहोत या गोड भ्रमात सगळेच आहेत. पण 'बंद' काय आहे? तर, फक्त इमारती! 'विद्यार्थ्यांचं शिक्षण थांबता कामा नये' असा परस्पर निर्णय घेऊन शी-शू वर्गापासून पद्व्युत्तर शिक्षणापर्यंतचे सगळे वर्ग जून महिन्यापासून 'ऑनलाईन' सुरू झालेले आहेत. 'मुलं नुसती दिवस-रात्र मोबाईलला चिकटून असतात' ही सार्वत्रिक तक्रार सगळेच पालक, शिक्षक एकेकाळी करत असत. आता 'शिक्षण' या नावाखाली मुलांच्या हातात हेच लोक आपण होऊन मोबाईल आणि लॅपटॉप देत आहेत! आणि या दुटप्पीपणाला समर्थन आहे 'न्यू-नॉर्मल'चं!

कोविड-१९ हे संकट न मानता, उलट एक पाऊल मागे घेऊन देशाच्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर मुळापासून विचार करायची, त्यात खरोखर

कल्याणकारी बदल करण्याची संधी राजकारण्यांना होती. ती त्यांनी गमावलेली आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी, की ज्या विद्यार्थ्यांच्या तथाकथित कल्याणासाठी हे सगळं चालू आहे, त्यांच्या गरजांचा, त्यांच्या मानसिकतेचा कोणीच विचार करताना दिसत नाहीये.



शिक्षणविषयक पुस्तकांचं समृद्ध दालन


विद्यार्थांचे प्रश्न नेमके कोणते असतात? त्यांच्यासमोर नक्की काय आव्हानं असतात? विद्यार्थांचं शिक्षण अधिकाधिक आनंददायी कसं करता येईल? –अशा काही कळीच्या प्रश्नांची उत्तरं 'मनोविकास प्रकाशन'तर्फे प्रकाशित झालेल्या काही पुस्तकांमधून मात्र निश्चितच मिळतील. प्रत्यक्ष शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांनी, तज्ज्ञांनी आणि संशोधकांनी लिहिलेली ही पुस्तकं वाचून विद्यार्थ्यांच्या विश्वाचा, त्यांच्यासमोर असलेल्या अडथळ्यांचा, त्यांच्या भावविश्वाचा अंदाज येऊ शकेल.

मुलांचं शिक्षण फक्त शाळेत होत नाही. घर, परिसर, शेजारी, समवयस्क मुलं, खेळ, खेळणी, पुस्तकं आणि शिक्षक–मुलांच्या जगातला प्रत्येक

घटक त्यांना काहीतरी शिकवत असतो. 'कुतुहल' या मुलांच्या व्यवच्छेदक लक्षणाला योग्य खतपाणी घालणारे शिक्षक आणि वातावरण मिळालं, तर मुलांच्या अनुभवविश्वात समृद्ध वाढ होते. बालशिक्षणाची हीच नस सुचिता पडळकर यांना सापडली. 'शिक्षणप्रवाहाच्या उगमापाशी' या पुस्तकात त्यांनी त्यांच्या 'फुलोरा' या शाळेत राबवलेल्या अनेक प्रयोगांबद्दल लिहिलेलं आहे. 'फुलोरा' ही पूर्वप्राथमिक वयोगटातल्या विद्यार्थ्यांची शाळा आहे. या शाळेत फुलं, पानं, बियांची ओळख मुलांना फक्त चित्रातून होत नाही, तर प्रत्यक्ष हात लावून होते. या शाळेतल्या मुलांच्या सहली शेतात, कारखान्यात जातात. पुस्तकी शिक्षणापेक्षा प्रत्यक्ष अनुभवावर भर दिला जातो, ज्यामुळे मुलांच्या आकलनात कमालीची भर पडते. या पुस्तकातले सगळे प्रयोग अतिशय वाचनीय आहेत. मुलांचा प्रतिसाद, त्यांना सुचलेल्या कल्पना पाहून बालशिक्षण किती संवेदनशीलतेने हाताळायला हवं याची जाणीव होते.

मातृभाषेतून शिकण्याचं महत्त्व

पूर्वप्राथमिक वयोगटातल्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहजपणे सामील करून घ्यायचं असेल तर मातृभाषेतून त्यांच्या शिक्षणाचा आरंभ करायला हवा असं मत सर्वत्र व्यक्त केलं जातं. सिल्व्हिया ऍश्टॅन-वॉर्नर या शिक्षिकेने याबाबतीत फार रोचक प्रयोग केले आहेत. न्यूझीलंडमधल्या 'मावरी' या मूलनिवासींच्या मुलांना त्यांनी मावरी भाषेतूनच इंग्रजी शिकवायला सुरुवात केली. त्या मुलांना पायरीपायरीने त्यांनी एक-एक ओळखीचा शब्द इंग्रजीत शिकवला. इंग्रजीची भीती कमी



झाल्यामुळे या मुलांना शिक्षणाबद्दल परकेपण वाटणं कमी झालं. सिल्व्हिया यांचा हा प्रवास त्यांच्या चिकाटीची परीक्षा पाहणारा होता. त्यांना आधी मावरी संस्कृती, मुलांची कौटुंबिक आणि सामाजिक पार्श्वभूमी समजून घ्यावी लागली. मुलांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. सिल्व्हिया यांनी या सर्व प्रवासाबद्दल अतिशय रोचकपणे ‘टीचर’ या त्यांच्या पुस्तकात लिहिलेलं आहे, ज्याचा समर्पक अनुवाद अरुण ठाकूर यांनी केलेला आहे.

वैशिष्ट्यपूर्ण शाळांची ओळख

खऱ्या शिक्षणाच्या शोधात’ या डेव्हिड ग्रिबल लिखित आणि डॉ. वृंदा चापेकर अनुवादित पुस्तकातून ब्रिटन, इक्वेडोर, भारत, इस्रायल, जपान, न्यूझीलंड, स्वित्झरलँड आणि अमेरिका इथल्या वैशिष्ट्यपूर्ण शाळांची ओळख आपल्याला होते. या सगळ्या शाळांनी शिक्षणाचे पारंपरिक समज खोडले आहेत. इथे मुलांवर उपस्थितीचं, विषयांचं, अभ्यासाचं कोणतंही दडपण नाही. तरीही या शाळांत शिकलेली मुलं अतिशय यशस्वी आहेत, मोठमोठ्या



हुद्द्यांवर काम करत आहेत, त्यांचं रुढार्थाने कोणतंही नुकसान झालेलं नाही. जेव्हा प्रत्येक मुलाची आवड, त्याचा कल आणि त्याचा आत्मसन्मान जपला जातो तेव्हा तो सर्वार्थाने बहरतो, याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे या शाळा. शिक्षणाच्या रुढ समजुतींना सुरुंग लावणाऱ्या या शाळांचा इतिहास आणि त्यांची शिक्षणपद्धती अतिशय वाचनीय आहे.

परिसर रचनेतून शिक्षण

शाळेत विद्यार्थी आणि शिक्षक जसे महत्त्वाचे असतात, तितकीच महत्त्वाची असते शाळेची इमारत! विद्यार्थ्यांच्या वयानुसार, त्यांच्या गरजांनुसार, भौगोलिक रचना लक्षात घेऊन बांधलेल्या प्रसन्न इमारतीत शिकायला कोणत्या विद्यार्थ्याला आवडणार नाही? हाच विचार करून ‘इमारत: एक शैक्षणिक साधन’ ही अभिनव संकल्पना भारतात रुजत आहे. शाळेची इमारतच विविध प्रकारे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत केवढा सकारात्मक बदल घडवून आणू शकते हे ‘एका समृद्ध शाळेचा प्रवास’ या रंगीत, सचित्र पुस्तकातून समजते. कबीर वाजपेयी यांची ही संकल्पना आहे आणि तिलाच त्यांनी



पुस्तकाच्या रूपातून मांडले आहे. ज्या शाळेत खांबांवर चित्र, भिंतींवर फळे, खिडक्यांना मणी, छायाप्रकाशाचे खेळ दाखवणारे झरोके, मुलांच्या उंचीनुरूप केलेली कपाटं असतील, तिथे मुलं किती आनंदाने रमतील याची आपण कल्पना करू शकतो. अशी शाळा कशी बांधता येईल, त्याकरता कोणते आराखडे करावे लागतील, खर्च किती येईल याचेही तपशील या सुंदर पुस्तकात आहेत.


नैतिक मूल्यांची रुजवणूक

नैतिक मूल्य या गंभीर विषयाला 'एकत्रित विचार करूया' हे अहिल्या चारी लिखित आणि अनुजा हर्डीकर अनुवादित पुस्तक हात घालते. राजकारण, हिंसा, पैसा, गरिबी या समस्यांनी ग्रासलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य कशी रुजवायची? चांगलं काय आणि वाईट काय याचा विचार पौगंडावस्थेतल्या मुलांनी कशाच्या आधारावर करायचा? त्यांच्यासमोर कोणाचे आदर्श आहेत? नैतिकता हा गुण प्रयत्नपूर्वक अंगी बाणवावा लागतो. सतत प्रश्न विचारून, स्वत:ला तपासून, सर्व कंगोरे घासून मग एखाद्या विषयावर मत बनवावं लागतं.



शिक्षकांनी पाठ्यपुस्तकं बाजूला ठेवून एखादा तास मुलांना सामाजिक विषयांवर बोलतं करायला हवं असं लेखिकेचं मत आहे. या प्रश्नोत्तरांतून मंथन होऊन मुलांच्या विचारांना दिशा मिळेल, बरं-वाईट समजेल, किमान ते स्व-विचार तरी करू लागतील. कोणते प्रश्न विचारायचे, कसे विचारायचे याचे योग्य मार्गदर्शन या पुस्तकातून मिळतं.

'शिक्षण' हा अनेक कंगोरे असलेला गुंतागुंतीचा, खोल आणि विस्तृत विषय आहे. या विषयावर सातत्याने विचार करणे, लिहिणे, चर्चा करणे गरजेचे आहे. 'मनोविकास प्रकाशन'ने या विषयाला समर्पित २२ पुस्तकं आजवर प्रकाशित केलेली आहेत. ही सर्वच पुस्तकं आपल्या शिक्षणविषयक जाणिवा अधिक विस्तृत करणारी आहेत. ५ सप्टेंबरचा शिक्षक दिन हा 'विद्यार्थी दिन' म्हणूनही साजरा व्हायला हवा. धोरणकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनीच शिक्षण आनंददायी आणि मनाच्या कक्षा रुंदावणारे होणार आहे. तसे ते लवकरात लवकर व्हावे हीच सदिच्छा!



माय कंट्री स्कूल डायरी

ज्युलिया वेबर गॉर्डन

अनुवाद : विद्या भागवत

पृष्ठ संख्या २६४ । मूल्य २५० रुपये

एका ध्येयवेड्या शिक्षिकेचा झपाटलेला प्रवास

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=411



एकत्रित विचार करूया


अहिल्या चारी

अनुवाद : अनुजा हर्डीकर

पृष्ठ संख्या १२० । मूल्य १२० रुपये

मुलांमध्ये नैतिक मूल्यं रुजवण्यासाठी

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=283



एका समृद्ध शाळेचा प्रवास


संकल्पना : कबीर वाजपेयी

अनुवाद : विनीता गनबोटे

पृष्ठ संख्या ९६ (संपूर्ण रंगीत) । मूल्य ४०० रुपये

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पूरक ठरणाऱ्या
शाळेची अनोखी संकल्पना

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=285



आपलं जग बदलणारी मुलं


अनुराधा मोहनी

पृष्ठ संख्या ५६ । मूल्य ९५ रुपये

'डिझाईन फॉर चेंज'च्या साथीने
मुलांनी घडून आणलेली प्रेरणादायी किमया!

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=459

आगामी



‘शिक्षा – माय एक्सपिरिमेंट्स ॲज ॲन एज्युकेशन मिनिस्टर’

शिक्षक : विश्वासाची पुन:स्थापना

आम आदमी पक्षाचे नेते मनीष सिसोदिया यांनी शिक्षणमंत्री या नात्याने दिल्लीतील सरकारी शाळांमध्ये अमूलाग्र बदल घडवून आणत देशासमोर शिक्षणाचं एक नवं मॉडेल ठेवलं आहे. हे मॉडेल नेमकं काय आहे? कोणत्या सुधारणा कशा पद्धतीने करवून घेतल्या याविषयी त्यांनी ‘शिक्षा – माय एक्सपिरिमेंट्स ॲज ॲन एज्युकेशन मिनिस्टर’ हे इंग्रजी पुस्तक लिहिलं आहे. त्याचा राहुल कदम यांनी केलेला मराठी अनुवाद मनोविकास प्रकाशनाकडून लवकरच वाचकांच्या हाती

सोपवण्यात येणार आहे. शिक्षक दिनाच्या निमित्ताने या आगामी पुस्तकातील एका प्रकरणाचा हा संपादित अंश खास आपल्यासाठी...

शिक्षण क्षेत्रात शिक्षकांची भूमिका विमानातील पायलट सारखी असते. हे जग अधिकच सुंदर करण्यासाठी समाजाला योग्य दिशेने गतीशील करणारे शिक्षक आपल्याला हवे आहेत.

सरकारी शाळांतील शिक्षकांच्या बाबतीत माझा अनुभव वेगळा आहे. या ठिकाणी ते केवळ शासकीय योजना आणि धोरणे यंत्रवतपणे राबविणारे सरकारी कर्मचारी बनून जातात. ही अत्यंत दुर्दैवी अशी गोष्ट आहे. आपण जेव्हा एखाद्या व्यक्तीकडे मुलांना शिकविण्याची जबाबदारी देतो तेव्हा आपण हे गृहीत धरतो की तो सर्वज्ञानी आहे आणि जवळ असलेले ज्ञान पुढील पिढीत संक्रमित करणे इतकीच त्याची भूमिका आहे.

मी जेव्हा दिल्लीतील सरकारी शाळांना भेटी देण्यास सुरुवात केली तेव्हा माझ्या असे लक्षात आले की सरकार या शिक्षकांकडे केवळ सरकारी कर्मचारी म्हणून पहायचे. त्यांना कुटुंब सर्वेक्षणाचे नमूने आणि नोंदवह्या पूर्ण करायला लावले जायचे. एखाद्या शाळेत मध्यान्ह भोजन, गणवेश आणि पुस्तकांचे नीट वाटप झाले की ती शाळा चांगली आहे असे सरकारचे मत बनत असे. या व्यवस्थेला नाखूष असलेले काही शिक्षक शाळा भरण्यापूर्वी किंवा नंतर खाजगी शिकवण्या घेत असत. काहींनी तर मालमत्ता खरेदी-विक्री, किराणा दुकाने, स्टेशनरी स्टोअर्स असे खाजगी उद्योग सुरू केले होते.

या निराशाजनक वातावरणाला एक रुपेरी किनारही होती. माझ्या भेटीदरम्यान मला काही शिक्षक असे

भेटले की जे या प्रकारच्या शिक्षणव्यवस्थेबद्दल समाधानी नव्हते आणि विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी अधिकच मेहनत घेण्यास एका पायावर तयार होते. मला ही बाब सुखावून गेली. आपल्या विद्यार्थ्यांना स्वत:हून आर्थिक मदत देणारे अनेक जेष्ठ व तरुण शिक्षकही मला भेटले. अनेकदा ते एखादा विषय सोपा करुन समजावून सांगण्यासाठी लागणारी उपकरणे वा साहित्य स्वत:च्या पैशातून विकत घेत असत.

अशा शिक्षकांमुळे मी प्रफुल्लीत झालो आणि अशा शिक्षकांची यादी बनवून त्यांच्या भेटी घेण्यास सुरुवात केली. केवळ महिन्या-दोन महिन्यात मला असे ४०० ते ५०० कार्यप्रवण शिक्षक भेटले. मी सचिवालयात त्यांच्याशी माझ्या वेळेनुसार चर्चा केल्या. बऱ्याचदा चहापानाच्या निमित्ताने त्यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली, त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केल्या. या चर्चामधून मी त्यांचे प्रश्न समजावून घेतले आणि ते कसे सोडविता येतील याचे कृतीशील मार्ग शोधण्यास सुरुवात केली. या संवादातून पुढे आलेल्या कल्पनांना परिवर्तनाच्या साच्यात स्थान दिले आणि त्यातून शैक्षणिक बदलांना सुरुवात झाली.

यात सर्वात पहिलं पाऊल उचललं गेलं ते अशैक्षणिक कामातून शिक्षकांना मुक्त करण्याचं. सरकारने एका आदेशाद्वारे फक्त निवडणुकीच्या राष्ट्रीय कर्तव्यासाठीच शिक्षकांना पाठविण्याचा निर्णय घेतला. अर्थात काही अधिकाऱ्यांना ही बाब खटकली. त्यांनी या निर्णयाला विरोध केला. माझे या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असणे इथे मला उपयोगी पडले. मी विचारण्यास सुरुवात केली, सरकार शिक्षक भरती करताना कोणते निकष लावते? त्यांनी

शिक्षण शास्त्राची पदवी घेतली आहे म्हणून आपण त्यांना नोकरी देतो की त्यांना सर्वेक्षण करता येते म्हणून? या प्रश्नांपुढे त्यांचा विरोध टिकाव धरू शकला नाही.

माझ्या असे लक्षात आले की शिक्षण विभागाने शिक्षकांसाठी दर आठवड्याचे एक वेळापत्रक तयार केले आहे. शिक्षकांना यानुसार विहीत वेळेत NCERT च्या पुस्तकांमधील अभ्यासक्रम संपवावा लागे. याबरोबरच त्यांना दर आठवड्याला प्रगती अहवाल लिहावा लागे. ही एक प्रकारची गुलामी होती. आम्ही हे एकसुरी वेळापत्रक रद्द केले. शिक्षकांना त्यांच्या गरजेनुसार वैयक्तिक डायरीत महिन्याचे वेळापत्रक तयार करून ते पाळण्यास सांगितले. आता ते अहवाल डायरीत आपली प्रगती नोंदवू शकतात. चांगल्या आणि हुशार शिक्षकांनी याचा फायदा घेतला आणि ते कामाला लागले.

आमच्या असेही लक्षात आले, की अनेक शिक्षक NCERT च्या पाठ्यपुस्तकांबाबत असमाधानी आहेत. त्यांना त्या पुस्तकातील काही उदाहरणे, तक्ते, स्वाध्याय, वापरलेले शब्द याबाबत तक्रारी होत्या पण त्यांचा नाईलाज होता. ते काहीच करू शकत नव्हते. शिक्षण विभागाने गाईडस वापरण्यावर बंदी घातली होती. इतकेच नव्हे तर जो शिक्षक-शिक्षिका वर्गात गाईड बुकच्या आधारे शिकवेल त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असे जाहीर केले होते. माझ्या मते हा निर्णय सुद्धा शिक्षकांवर केलेली सक्ती होती. यावर शिक्षकांनी स्वत: त्यांचे गाईडबुक आणि पूरक साहित्य तयार करावे असे आम्ही ठरविले. या दिशेने कामाला सुरुवात केली. २०१६ साली उन्हाळी सुट्टीत विविध शाळा आणि विषय शिक्षकांच्या चार दिवसीय विषय

निहाय कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यातून तयार झालेले पूरक साहित्य ‘प्रगती’ या नावाने दिल्ली शिक्षण संचालनालयाने प्रकाशित केले. हे साहित्य सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले. हा अशा प्रकारचा पहिलाच प्रयत्न होता आणि तो कमालीचा यशस्वी झाला. आता दरवर्षी उन्हाळयाच्या सुट्टीत संबंधित विषयाचे शिक्षक एकत्र येतात आणि हे पूरक साहित्य अद्ययावत करतात.

सन २००७ पासून दिल्लीत नियमित शिक्षकांची भरती जवळपास झालीच नव्हती. ५०००० शिक्षकांपैकी जवळपास १८००० शिक्षक हे हंगामी किंवा कंत्राटी या स्वरुपाचे होते. जे शिक्षक बऱ्याच कालावधीपासून हंगामी (कंत्राटी) म्हणून काम करत होते त्यांना अनुभवी म्हणून व निवड चाचणी घेवून नियमित करण्याचा आम्ही प्रयत्न केला. परंतु न्यायालयाच्या काही निर्णयांची यात आडकाठी झाली. यानंतर आम्ही दिल्ली विधानसभेत एक विधेयक पारित करुन त्यांना कायम नियुक्ती देण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. नागरी सेवा हा केंद्राच्या अखत्यारीतील विषय आहे आणि केंद्राने आमचे म्हणणे मान्य केले नाही. हंगामी शिक्षकांच्या मानधनातून त्यांच्या कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागणे शक्यच नव्हते. यास्तव आम्ही नियमित शिक्षकांना मिळणारे काही जादाचे भत्ते वगळता नियमित शिक्षकांइतकेच त्यांचे वेतन केले. सध्या हंगामी शिक्षकांना त्यांच्या पदानुरुप नियमित शिक्षकांइतकेच वेतन दिले जाते. या निर्णयामुळे हंगामी शिक्षकांवरील अन्याय पूर्णांशाने दूर झाला नसला तरी निदान कुटुंबाच्या गरजा सन्मानपूर्वक भागविण्याइतके वेतन त्यांना मिळत आहे. २०१५ पर्यंत हंगामी शिक्षकांना दरवर्षी कामावरून कमी केले जात असे व पुढील

शैक्षणिक वर्षासाठी पुनर्नियुक्त केले जात असे. या पद्धतीमुळे कोणताच हंगामी शिक्षक आपल्या अध्यापनावर पूर्ण लक्ष केंद्रीत करून शकत नसे. आम्ही हा प्रकार थांबविण्याचा निर्णय घेतला. यामुळे एक प्रकारची नोकरीची अनिश्चितता आणि कौटुंबिक आर्थिक परवड थांबली. दिल्लीच्या शिक्षण मॉडेलचा हा एक मोठा हिस्सा आहे. आज हंगामी शिक्षकांना नियमित शिक्षकांचा दर्जा देणारे दिल्ली हे भारतातील एकमेव राज्य आहे.

शिक्षकांना सक्षम करण्यासाठी मग ते हंगामी असोत वा नियमित प्रत्येकाला एक टॅबलेट (टॅब) देण्याचे महत्वपूर्ण पाऊल दिल्ली सरकारने उचलले. याचा उपयोग त्यांना हजेरी नोंदविणे आणि निकाल ऑनलाईन पद्धतीने तयार करण्यासाठी झाला. अनावश्यक लिखाणाला यामुळे फाटा देण्यात आला. याचा दुसरा फायदा हा की हजेरीपासून ते निकालापर्यंतची सर्व माहिती एकत्रितरीत्या शिक्षणमंत्री, सचिव व संचालकांना तत्काळ उपलब्ध होऊ लागली.

शिक्षकांच्या पदाची प्रतिष्ठा राखण्यासाठी व त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही स्टाफरुमच्या नूतनीकरणाची योजना बनविली. सध्याच्या स्टाफ रुम म्हणजे मोडक्या तोडक्या टेबल खुर्च्या आणि जीर्ण कपाटांनी भरलेल्या अडगळीच्या खोल्याच वाटत होत्या. त्या खोल्यांना जिथे शिक्षक अभिमानाने बसू शकतील, जेवण करू शकतील, चर्चा करू शकतील अशा खोल्यांमध्ये परावर्तित करण्याचे ठरविले. प्रत्येक स्टाफरुममध्ये एक कॉफी मशीन व फ्रीजसुद्धा ठेवण्याचे ठरविले. त्यामुळे दिल्लीतील प्रत्येक सरकारी शाळेतील स्टाफरुमचे रूपडे पालटलेले असेल.

ही केवळ रूप पालटण्यासाठी केलेली उधळपट्टी नाही, तर सरकाराचा शिक्षकांप्रती असलेला व्यापक दृष्टिकोन दर्शविणारा बदल आहे. शिक्षण विभागाने शिक्षकांचा आदर करावा हा माझा हेतू होता. आपल्या देशात शिक्षकांबद्दल असे म्हटले जाते की,

गुरु गोविंद होऊ खडे,
काके लागू पाय ?
बलिहारी गुरु अपने, गोविंद दियो बताय ।।


(जर एकाचवेळी गुरु आणि परमेश्वर माझ्यासमोर आले तर सर्वप्रथम मी कुणासमोर नतमस्तक होवू? याप्रसंगी मी गुरुंचे प्रथम ऋण व्यक्त करीन कारण परमेश्वर प्राप्तीचा मार्ग त्यांनीच मला दाखविला आहे.)

गुरु बिन ज्ञान न ऊपजै,
गुरु बिन मिलै न मोष ।
गुरु बिन लखैन सत्य को,
गुरु बिन मिटै न दोष ।।

गुरुशिवाय ज्ञान प्राप्ती होत नाही. गुरुशिवाय मोक्षप्राप्ती होत नाही. गुरुविना सत्य प्राप्ती ही अशक्य आणि दोषमुक्तीही!

जर शिक्षकांना मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या चिंतामुक्त केले तरच ते चांगल्या प्रकारे शिकवू शकतील. दिल्ली सरकारने याच दिशेने सारे प्रयत्न केले आहेत. अजून आम्हाला मोठा पल्ला गाठायचा आहे.

पुस्तकं काही सांगू इच्छितात।
तुमच्या संगतीत राहू इच्छितात।।



दिवास्वप्न

गिजुभाई बधेका

अनुवाद : निरंजन घाटे

पृष्ठ संख्या ८४ । मूल्य १०० रुपये

एका शिक्षणतज्ज्ञाचे स्मरणरंजन

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=277



मुलं नापास का होतात?


जॉन होल्ट

अनुवाद : सुजाता गोडबोले

पृष्ठ संख्या २१६ । मूल्य २०० रुपये

मुलांच्या अपयशाचा शोध घेणारं व 'शिक्षण' हा गंभीर विषय आहे याचं भान देणारं पुस्तक.

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_165&product_id=403




लाईमलाईट

अच्युत गोडबोले, नीलांबरी जोशी

पृष्ठ संख्या ५५२ । मूल्य २९५ रुपये

विदेशी चित्रपटसृष्टीची अनोखी यात्रा...!

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&path=81_172&product_id=363



सिंफनी


अच्युत गोडबोले, दीपा देशमुख

पृष्ठ संख्या ५४८ । मूल्य ३८० रुपये

पाश्चात्त्य संगीताची सुरेल सफर

पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी क्लिक करा.
https://manovikasprakashan.com/index.php?route=product/product&product_id=920


वाचकाचा प्रतिसाद...



वेगळ्या जगाची सफर घडवणारी मुसाफिरी

अच्युत गोडबोले आणि अतुल कहाते यांचे 'गुलाम – स्पार्टाकस ते ओबामा', हे पुस्तक अगदी अधाश्यासारखं वाचून हातावेगळं केलं. अतिशय सुंदर, वाचकाला खिळवून ठेवणारं हे लेखन आपल्या हातून घडलं आहे. मराठी वाचक यासाठी आपला नेहमी ऋणी असायलाच हवा. आद.गोडबोले सरांच्या लिखाणाचा मी तसा कॉलेज जीवनापासून चाहता आहे. 'झपूर्झा' हे मी वाचलेलं त्यांचं पहिलं पुस्तक. त्यानंतर एक एक पुस्तक वाचत गेलो आणि एक वेगळं, नवं जग माझ्यासारख्या ग्रामीण भागातील मुलाला आपल्या लेखन प्रपंचामुळेच समजलं.

'गुलाम' हे पुस्तक आजपर्यंतच्या बऱ्याच अवास्तव गोष्टींच्या बाह्य रूपावर भाळलेल्या शक्यतांना सुरुंग लावण्याचं काम करतं. एखाद्याला काळ्या म्हणून चिडवत असताना काळ्या या



शब्दामागच्या वेदना किती त्रासदायक आहेत याची जाणीव ते वाचकाला करून देतं. आपले संदर्भ, आपला अभ्यास, आपली तळमळ शब्दाशब्दातून जाणवत राहते हे आपल्या लिखाणाचं खूप मोठं वैशिष्ट्य आहे. मी आदरणीय गोडबोले सरांना इस्लामपूर या ठिकाणी कोल्हापूर वरून खास ऐकण्यासाठी गेलो होतो. त्यामुळे सरांचं लिखाण वाचताना ते समोर उभारून आपल्याशी बोलत आहेत असंच वाटत राहत...

आदरणीय कहाते सर आपणास भेटायची मात्र इच्छा आहे. या दोन्ही लेखकांच्या मुसाफिरीने मला एका वेगळ्या जगाची सफर घडवून माझ्या विचारात भर पाडली. त्याबद्दल आपल्या दोघांचं मनःपूर्वक आभार.

आपला वाचक

रणजित आशा अंबाजी कांबळे

मु. पो. वेंगरूळ, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.

-९०९६२८१२४९



१२५ पुस्तकांचा मौल्यवान संच अवघ्या ७४१० रुपयांत

पुस्तक संच घ्या आणि भरघोस सवलत मिळवा

मूळ किंमत १०,५८४ रुपये असलेल्या या संचात...

डॉ. बाळ फोंडके

हवामान । गुरुत्वाकर्षण । अणू-रेणू । मेंदू । जनुकं । रोगप्रतिकारशक्ती । कसं? । का? । काय? । किती? कुठं? । केव्हा? । कोण? (१३ पुस्तके)

पद्मश्री अरविंद गुप्ता

खेळ विज्ञानाचे । उद्योगी व्हा । असे घडले शास्त्रज्ञ । 'ग' गणिताचा । कथा सौर ऊर्जेची । सायकलवाल्या स्त्रिया । खेळण्यांचा खजिना । सोपी विज्ञान खेळणी छोटी खेळणी-मोठे विज्ञान । काडेपेटी आणि इतर विज्ञान खेळणी । टाकाऊतून शिकाऊ । कचऱ्यातून करिष्मा । कचऱ्यातून कमाल। कचऱ्यातून चमत्कार करून पहा (१५ पुस्तकांची विज्ञान खेळमाला)

अच्युत गोडबोले व दीपा देशमुख

जग बदलणारे जीनियस । तंत्रज्ञ जीनियस । भारतीय जीनियस (१८ पुस्तकांचे तीन संच)

आनंद घैसास

खेळ खेळूया विज्ञानाचे (भाग १ ते ३)। युवा विज्ञान कुतूहल (भाग १ ते ३) । शास्त्रज्ञ व्हा (भाग १ ते ४) आपली सूर्यमाला (६ पुस्तकांचा संच) । आपले विश्व दुर्बिणी आणि वेधशाळा । खगोलशास्त्रज्ञ । आपली सूर्यमाला (एकूण २० पुस्तके)

पुस्तक संच घ्या आणि भरघोस सवलत मिळवा



डॉ. जगन्नाथ दीक्षित व डॉ. अंजली दीक्षित
मेडिकल जनरल नॉलेज
(इंग्रजी-मराठी १० पुस्तकांचा संच)

अतुल कहाते
बिल गेट्सचं मायक्रोसॉफ्ट । बखर मोबाइल फोनची । गुगल । फेसबुक । ट्विटर । ॲमॅझॉन । तंत्रज्ञानाचा ओव्हरलोड (७ पुस्तकांची तंत्रज्ञानमाला)

किमया गणितमैत्रीची । गणितातल्या गमतीजमती । दिनदर्शिकेमधली जादू । १०० चौरसांचे अनेक प्रयोग । आळशी माणसाचा विषय-गणित । गणितांगण (मराठी-इंग्रजी)। युनेस्को । स्टोरी ऑफ फिजिक्स । शोधांच्या कथा (१८ पुस्तकांचे ३ संच)

आपले पर्यावरण । भारतातील सस्तन प्राणी । वनस्पतीजगातून सहल । रोचक विज्ञान । विज्ञानातील चमक । विज्ञानाचे मोती । Gems of Science । Fun with Science । Science Sparks । प्रयोगशाळेशिवाय विज्ञानप्रकल्प । वैज्ञानिक प्रकल्प । वनस्पतीशास्त्रातील विज्ञानप्रकल्प । मजेदार विज्ञानप्रकल्प । निर्मितीचं आकाश । शोध आणि बोध । प्रोजेक्ट फंडा । ८०० शालेय प्रकल्प (गणित-विज्ञानावरील २६ पुस्तके)

सूचना - संचाचं सवलत मूल्य पुस्तकांच्या उपलब्धतेनुसार बदलेल.

संच मिळविण्यासाठी संपर्क : ०२०-२९८०६६६५ । ८८८८५५०८३७